नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

दर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

सप्टेंबर
१९६२

★

मूल्य ५० न. पैसे

या अंकात

* प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित
* प्रा. गो. मा. कुलकर्णी
* कुसुमानंद
* म. ना. श्रीखंडे
* राजा महाजन

शिवाय, संपादकीय,
परिचय–परामर्श, संघवार्ता इ०

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

संपादक:- प्रा. श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र--

:: संपादक मंडळ ::
भा. श्री. परांजपे
व. कृ. वऱ्हाडपांडे
मा. गो. वैद्य

युगवाणी

संपादक:--श्री. मा. कुलकर्णी

वर्ष १७] सप्टेंबर १९६२ [अंक ५

अनुक्रमणिका

क्रमांक	विषय	पृष्ठ
१	संपादकीय	२
२	रे० टिळक	३
३	नव्या जगात	१७
४	कुणी वुडवाव्या माझ्या (कविता)...	२८
५	मृगजळ	२८
६	आठवण	२९
	परिचय परामर्श	
७	तुकाराम महाराजांची गुरु परंपरा...	३०
८	संघवार्ता	४०

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

संशोधनाविषयी थोडेसे

मराठी साहित्याच्या संबंधात आज होत असलेल्या संशोधनाकडे पाहिल्यास काही अनिष्ट प्रवृत्ति या क्षेत्रात शिरल्या आहेत व शिरत आहेत असे दिसते. संशोधकाचा भर वस्तुतः विश्वसनीय अशा प्रमाणावर व तर्कसंगत युक्तिवादावर असायला हवा. परंतु आज दुर्दैवाने या दोन्ही गोष्टींकडे संशोधकांचे दुर्लक्ष होत चालले आहे असे कित्येक संशोधनपर लिखाण पाहून वाटते. वाळूवर इमले उभारावेत त्याप्रमाणे अगदी कच्च्या आधारावर महत्वाचे सिद्धान्त उभारले जातात आणि तर्काचा लगाम सैल सोडून कल्पनेचा वारू मोकाट सोडला जातो. अमुक एक सिद्धान्त मांडायचा हे इतर क्षेत्रातील कांही पूवग्रहांना अनुसरून आधी निश्चित करावयाचे व मग कसेतरी पुरावे गोळा करावयाचे असा उलटा क्रम कित्येकदा अवलंविला जातो. एकाने केलेला केवळ तर्क दुसऱ्याचा आधार ठरतो व तिसरा त्यावर सिद्धान्ताचे शिक्कामोर्तब करतो. असे हे एकामेका साहाय्य चाललेले असते.

कवींनाच शोभणारा निरंकुशपणा जसा संशोधकांच्या ठिकाणी दिसतो तसाच सुधारकांनाच शोभणारा मूर्तिभंजकपणाहि त्यांच्यात आढळून येतो. जे प्रतिष्ठित असेल त्याला हादरा द्यायचा ही ईर्ष्या संशोधकांच्या ठिकाणी दिसू लागली आहे. भक्कम पुराव्यांनी एखादी सुप्रतिष्ठित गोष्टहि जर खोटी ठरत असेल तर ती तशी ठरविण्याला हरकत नाही. अर्थात् अशा प्रसंगी सुद्धा सत्यापेक्षा समाजहिताला अग्रस्थान द्यावे अशीहि एक विचारसरणी आहे. 'यद्भूतहितमत्यंतं तत्सत्यं' अशी एक सत्याची व्याख्याहि आहे. परंतु आजचे कित्येक संशोधक जे सत्य म्हणून पुढे मांडतात ते निर्भेळ सत्यहि रहात नसल्यामुळे या प्रश्नापर्यंत मजल येत नाही. तेव्हा निराधार किंवा अगदीच कच्चा आधार असलेले मत सत्य म्हणून मांडून प्रस्थापित गोष्टींना विस्थापित करण्याचा जो प्रयत्न अशा संशोधकांच्या कडून चालतो तो अश्लाघ्य आहे.

संशोधनाच्या क्षेत्रात हल्ली दिसून येणारी आणखी एक गर्हणीय बाब म्हटली म्हणजे एकदा नाशावित झालेली मतेच नवीन कोणत्याहि पुराव्या शिवायच पुन्हा मांडण्याची होय. या प्रकारामुळे अनेक प्रश्नाच्या बाबतीत संशोधन हे आवर्तात सापडले आहे.

या व या सारख्या अनिष्ट प्रवृत्तिमुळे मराठीतील संशोधनाचा दर्जा घसरला आहे. संशोधकाची प्रतिष्ठा कमी झाली आहे. संशोधनाचा दर्जा वाढून संशोधनाच्या कार्याचे पाऊल जर पुढे पडायचे असेल तर संशोधकांनी पुढील पथ्ये पाळणे आवश्यक आहे. (पृष्ठ ३९ वर)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रे० टिळक

(६ डिसेंबर १८६१–९ मे १९१९)

लें०–प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित

–१–

रेव्हरंड नारायण वामन टिळक यांच्या कवितेचा उद्गम त्यांच्या व्यक्तित्वाच्या विकासात आहे. त्यांचे अठ्ठावन वर्षांचे व्यक्तित्व निरनिराळ्या परिस्थितून आकारास आले होते. त्या परिस्थितीतील प्रसंगांचे त्यांच्या मनोभूमीवर खोल संस्कार उमटले होते. जन्मापासून तों वयाच्या नवव्या वर्षापर्यंत ते कोंकणात करज गावाला आपल्या आजोळी लहानाचे मोठे होत होते. त्यांची आई जानकीबाई यांना पद्यरचनेचा नाद होता. तोच नाद टिळकांना लागला. किशोरावस्था ओलांडण्यापूर्वीच ते ओव्या, अभंग, दिंड्या, साक्या आदि पद्यरचनेचे सोपे प्रकार हाताळून गुणगुणूं लागले. त्यांच्या आईचे वडील वेडेकर हे देवपिसे होते. एकदा पंढरीची वारी करून परतल्यावर ते करजगांवात व त्यागांवच्या परिसरात विदेही स्थितीत परिभ्रमण करू लागले. भजनापूजनात आणि सन्तवाणीच्या पठनात व रटनात त्यांचा काळ व्यतीत होई. बाळ टिळकांना ते आपल्या बरोबर घेऊन फिरत. अशा रीतीने बालपणीच मराठी संतांची अभंगवाणी टिळकांच्या पवित्र कानांवर पडली आणि भक्तिभावना त्यांच्या अंत:करणात खूप खोल रुजली.

टिळकांचे वडील वामनराव तलाठी होते. व्यवसायाच्या निमित्ताने त्यांच्या वारंवार बदल्या होत. त्यामुळे टिळकांच्या शालेय जीवनाची फार हेळसांड झाली. वामनरावाचे आचरण शुद्ध व निर्मळ होते. परंतु वृत्ति कर्मठ व स्वभाव तापट होता. एकदा यःकश्चित् अपमानाच्या कल्पनेवरून त्यांनी जानकीबाईच्या कमरेत लाथ मारली. त्यासरशी जानकीबाई ज्या कोलमडून पडल्या त्या पुन्हा उठल्या नाहीत. कर्मठ वडिलांच्या या कठोरपणाचा टिळकांच्या कोमल मनावर विपरीत परिणाम घडला असला तर आश्चर्य नाही. त्यांच्या मनात वडिलाबद्दल कायमची अढी बसली. वामनरावांचा हस्तरेषांवर आणि ग्रहांवर फार भरवसा होता. त्यावरून ते टिळकांना हिडीस फिडीस करीत. टिळकांनी १८८५ साली 'संगीत आनंदराव किंवा पाशबद्ध स्वदेशाभिमानी'

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाटिका लिहिली आहे. ती त्यांनी केवळ कर्तव्य म्हणून वामनरावांना अर्पण केली आहे. टिळकांनी आपल्या वाङ्मयीन जीवनाच्या उषःकाली 'गंगा' काव्य लिहिले होते. परंतु त्याचा मुद्रणसंस्कार झाला नाही. पुढे त्यांनी ते काव्य गद्य कथेत रूपांतरित केले. ही कथा त्यांनी आपल्या मातेला अर्पण केली आहे. 'जिने मला स्वतः रचलेली गाणी' म्हणून दाखवून कविताप्रिय केला व माझ्या अंगीं रसिकता आणली' असे त्या अर्पणपत्रिकेत शब्द आहेत. त्यावरून टिळकांची आपल्या मातेच्या ठायी किती निष्ठा होती ते व्यक्त होते.

टिळकांचे चार इयत्तापर्यंतचे इंग्रजी मराठी शिक्षण कल्याणास व पुढे थोडे शिक्षण नाशकास झाले. १८७९ साली त्यांचा त्या काळच्या वहिवाटीप्रमाणे पूर्वाश्रमीच्या कुमारी मनूताई गोखले म्हणजे लक्ष्मीबाई टिळक यांच्याशी विवाह झाला. नाशकास टिळकांच्या मागे स्वतःचा संसार आणि लहान भावंडांचे शिक्षण अशी दुहेरी जबाबदारी असल्यामुळे त्यांना स्वावलंबी व्हावे लागले. त्यांना वडिलांचा नाममात्र आधार होता. सासुरवाड व साडू खाऊन पिऊन सुखी असल्यामुळे त्यांचा बराच आधार होता. परंतु टिळकांच्या स्वतंत्र व स्वाभिमानी स्वभावास तो रुचत नसावा असे वाटते. याचा परिणाम टिळकांची वृत्ति अस्थिर होण्यात झाला.

नाशकाच्या वास्तव्यात टिळकांच्या विकसनोन्मुख प्रतिभेवर अतिशय उदात्त व उदार संस्कार झाले. तेथे ते सुप्रसिद्ध भटजींच्या मठात संथा घेण्यास जात असत. या स्पृहणीय उपक्रमामुळे त्यांच्या प्रतिभेची प्रभा फाकली. त्यांनी वैदिक वाङ्मयाचा व उपनिषदांचा अभ्यास चालवला. नाशकास 'स्वसुधारणेच्छु सभा' या नांवाची एक सभा होती. तिच्या वतीने वक्तृत्वाचे समारंभ होत. त्यात टिळक युक्तिसंगत विवादक व अस्खलित वक्ते म्हणून पुढे आले. त्याकाळी महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी वक्तृत्वाचे सामने झाले त्या त्या ठिकाणी सम्मिलित होऊन टिळकांनी पारितोषके पटकावली. शरणपुरचे रेव्हरंड ल्यूकस जोशी हे गंगेवर मारुतीसमोर ख्रिस्तीमतावर प्रवचने देऊन त्याचा प्रचार करीत. टिळक हे मोठ्या हिरीरीने त्यांच्या मतांचे खंडन करीत. यावरून टिळकांना याच वेळेपासून भिन्न भिन्न धर्ममतांचा आणि त्यांच्या शास्त्रांचा अभ्यास करण्याचा छंद जडला असावा असे वाटते. वक्तृत्वाच्या चढाओढीत भोंडे, पारख, वैद्य आदि टिळकांचे प्रतिस्पर्धी असत. यांपैकी बळवंत खंडूजी पारख हे पुढे शीघ्रकवि म्हणून प्रसिद्धीस आले.

नाशकास टिळकांना गणेश सदाशिवशास्त्री लेले हे काव्यगुरु भेटले. लेल्यांनी दक्षिणाप्रैज कमेटी करिता रचलेली 'रघुवंश', 'शिवाजी', 'कृष्णाकुमारी' अमरुशतक' इत्यादि काव्ये प्रसिद्ध आहेत. टिळकांना लेल्यांच्या सहवासात,

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कालिदास, भवभूति, बाण आदि अभिजात संस्कृत वागीशांच्या वाणीचा परिचय झाला. या कवींच्या ललितकृतीचे परिशीलन करून टिळक मार्मिक व रसिक बनले. परंतु त्यांच्या अंतःकरणावर वैदिक विचारांचा व संतांच्या अमोघ वाणीचा जसा प्रभाव पडला तसा तो या अभिजात संस्कृत कवींच्या काव्याचा पडला नाही.

लौकिक दृष्टचा टिळकांचे शालेय शिक्षण १८८० मध्येच संपुष्टात आले होते. परंतु त्यांची जीवनजिज्ञासा व ज्ञानलालसा यत्किंचित् कमी झाली नव्हती. निरनिराळ्या संस्कृत, प्राकृत व इंग्रजी ग्रंथांचे त्यांचे अध्ययन अखंड चालू होते.

टिळकांचा जन्मकाळ हा या भारत देशात नवीन ज्ञानाच्या उदयाचा काळ होता. महाराष्ट्रात विष्णुबावा ब्रह्मचारी, विष्णु परशुरामशास्त्री पंडित, ज्योतीबा फुले, लोकहितवादी आदि पुढारी धर्म सुधारणाचे व समाज सुधारणांचे परिवर्तन करीत होते. आर्यसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज यांच्या सारख्या सुधारणेच्या कार्य करणाऱ्या संस्था उदयास येत होत्या. राजकीय क्षेत्रात न्यायमूर्ति रानडे, बाळ गंगाधर टिळक, फेरोजशहा मेथा आदि धुरीण स्वराज्यप्राप्तिसाठी बद्धपरिकर झाले होते. वाङमयाच्या प्रांतात विष्णुशास्त्री चिपळुणकर, आगरकर, अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी विचारक्रांन्ति घडवून आणली होती. ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, ज्ञानसंग्रह, विविधज्ञानविस्तार आदि नियतकालिके लोकजागृतीचे व ज्ञान प्रसाराचे कार्य करीत होती. १८८०–८५ च्या सुमारास टिळक ऐन तारुण्यात असताना या वेगवेगळ्या क्षेत्रातील सुधारणा अत्यंत जोरात होत्या. टिळकांच्या 'स्वदेशी पाशबद्ध', 'माझी भार्या', 'बापाचे अश्रु' इत्यादि प्रारंभीच्या साहित्यात त्या काळच्या या चळवळीचे सूर स्पष्टपणे ऐकू येतात. मात्र पुढे वाढत्या वयात स्वाभाविकरीत्या हे सूर संथ व सौम्य झाले आणि 'कोलाहल मौनगानात' विलीन झाले.

१८८० ते १८९५ हा जवळ जवळ पंधरा वर्षांचा काळ टिळकांच्या आयुष्यातील भ्रमंतीचा होता. ते नाशिक, जलालपूर, धामक, नागपूर, मुरवाड, मुंबई, पुणें, संगमनेर, राजनांदगांव, कळवण, वणी इत्यादि ठिकाणी भटकत होते. या अवधीत त्यांनी कीर्तने केली, शाळा उघडल्या, पुस्तके लिहिली व छापली आणि नियतकालिके चालविली. वरील गांवापैकी कुठेहि ते फार काळ स्थिरावले नाहीत. एका गांवात राहून थोडा फार जम बसतो न बसतो तोच ते उठून दुसऱ्या गांवी निघून जात. त्यांचे मन अशांत व अस्वस्थ होते. ते शांतीच्या शोधात होते. भिन्नभिन्न धर्ममतांचा व शास्त्रांचा अभ्यास करताना त्यांना तुलनेने ख्रिस्तीमत पटले. मनाने त्यांनी त्याचा स्वीकार केला. परंतु त्याचा उघडपणे स्वीकार करण्याच्या आड प्रेमाचे अनेक पाश आणि अदम्य मोह येत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होते. शेवटी त्यांच्यावर विजय मिळवून १० फेब्रुवारी १८९५ रोजी त्यांनी मुंबईस अमेरिकन भजनालयात दुपारी ४॥ वाजतां ख्रिस्तीमताची दीक्षा घेतली. यानंतरहि त्यांची पांच वर्षे असमाधानात गेली. पांच वर्षांनी त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई व चिरंजीव शरच्चंद्र यांनी दीक्षा घेतली. पति, पत्नी व अपत्य या संसारातील पवित्र त्रयीचे पुनर्मीलन झाले, आणि येथून पूढे टिळकांच्या आयुष्यातील सोज्वळ उत्तरार्धास प्रारंभ झाला.

—२—

टिळकांनी ख्रिस्तीमताची दीक्षा घेण्यापूर्वी जी गद्य पद्य पुस्तके लिहिली आहेत, त्यात साहित्यगुण फारसे नसले, तरी त्यांच्या चरित्राच्या दृष्टीने ती महत्त्वाची आहेत. 'घडचाळ काय म्हणते ?' आणि 'मुलांस योग्य बक्षीस' ही त्यांची लहान काव्ये विद्यार्थ्यांना उपदेश म्हणून रचण्यात आली आहेत. यांपैकी पहिले काव्य कदाचित् कौपरच्या 'टास्क' वरून सुचले असावे. त्याकाळी इंग्रजी शाळात कौपर, पोप, गोल्डस्मिथ आदि मध्ययुगीन कवींची कविता अभ्यासक्रमात असे. दुसऱ्या काव्यात ईश्वर, धर्म, गुरु, आईबाप इत्यादि विषयावर ७५ बोधपर पद्ये आहेत. विविधज्ञानविस्तार म्हणते, 'सरस कवितेपुढे ही पद्ये फिक्की आहेत' (मार्च १८९०) परंतु टिळकांच्या मनाची ठेवण आरंभापासूनच कशी धर्मोपदेशकाची व नीतिशिक्षकाची होती हे जाणण्याच्या दृष्टीने हे पुस्तक महत्त्वाचे आहे. पुन्हा हे टिळकांचे प्रारंभीचे साहित्य आहे हे लक्षात घेतले पाहिजे. 'माझा ओसाड पडलेला गांव' हे गोल्डस्मिथच्या 'डेझर्टेड विलेज'चे रूपांतर आहे. यात प्रत्येक भागास 'सर्ग' ही संज्ञा दिली आहे व वृत्तवैचित्र्य साधले आहे. याची रचना सरस व सफाईदार नसली, तरी रुक्ष व बोजड नाही. या काव्यात मूळ इंग्रजीत उपदेशपरता व ओझरते तत्त्वज्ञान आहे. शिवाय स्वदेशसेवेचे अस्फुट स्वर आहेत. टिळकांना ते प्रिय असल्यामुळे रूपांतरात तंतोतंत तसेच उतरले आहेत. टिळकांनी या रूपांतरात Busy Mill ला 'न खिळणारे चक्र' हा शब्द योजला आहे. त्याकाळी आजच्या सारख्या 'दळण गिरण्या' अस्तित्वात नव्हत्या। सातव्या 'सर्गा'त Village Preacher चे म्हणजे 'गांवच्या पुराणिका'चे शब्दचित्र आहे. ते हुबेहूब वटले आहे. कदाचित् या वेळेपासूनच टिळकांसमोर त्याचा आदर्श असावा. पुढे ते नगराला 'रेव्हरंड' झाले;

याच स्थळी असावे ग्रामा ! धर्मोपदेशकालय रे
साधें परि सुंदर ते ज्यामाजी गर्व काडिमात्र नुरे
ग्रामा ! लहान थोरा होता धर्मोपदेशक प्रिय तो
लघुवेतन त्यास परि श्रीमान् त्याला समस्त जन गणितो

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाही न दुःखितांचे गुणदोष कधींच तो दयार्द्र सदा
कळवळुन हात देई; त्यास न औदार्य कीर्ति हेतु सदा

लडिवाळपणें वाळक मार्गे मार्गे करूनि खोड्या ते
फिरती त्याच्या ओढिति ममतेनें कोणि अंगवस्त्रातें

टिळकांचे हे रूपांतर किती मूळावरहुकूम आहे हे शेवटच्या आर्येचे हे मूळ इंग्रजी पाहिले म्हणजे लक्षात येईल;—

Even Children followed with endearing wile,
And plucked his gown to share the good man's smile.

टिळकांनी आयुष्याच्या उत्तरार्धात एलिझावेथ वॅरेट ब्राउनिंगच्या 'सॉनिटस् फ्रॉम पोर्च्युगीज' मधील कांही विभागांची रूपांतरे केली आहेत. परंतु त्यात मूळातले सौंदर्य व माधुर्य नाही. मात्र 'सॉनेट' साठी टिळकांनी 'वीणाचतुर्दशक' हा प्रतिशव्द योजिला आहे, तो लक्षणीय आहे. 'डेझर्टेडविलेज'ची वावा गर्दे व ग. रा. हवालदार यांनीहि रूपांतरे केली आहेत. वावा गर्दे यांचा पिंडहि टिळकांच्या पिंडाप्रमाणे धर्मोपदेशकाचा होता.

टिळकांची 'आनंदराव अर्थात् स्वदेशी पाशवव्द' ही नाटिका आणि 'वापाचे अश्रु' ही काव्ये त्याकाळी त्यांच्या हृदयात स्वदेशसेवेची जी ऊर्मि उसळली होती तिची द्योतक आहेत. केशवसुतांनी 'गांवी गेलेल्या मित्रा'च्या स्वदेशपाशवद्धतेचे जे वर्णन केले आहे, ते टिळकांना सही सही लागू पडते. या नाटिकेचा नायक आनंदराव अमेरिकेस जाण्याचा वेत करतो. तेव्हां त्याचे वडील नाराज होतात व म्हणतात, "त्या वेइमानी पोराला आतापर्यंत पोसला, लग्न करून दिले, विद्या शिकविली, नाना प्रकारच्या खस्त्या खाल्या, त्या काय त्याने मला म्हातारपणी सोडून परदेशात जाऊन ख्रिस्ती व्हावे म्हणून की काय !' हे वर्णन देखील टिळकांना जुळण्याजोगे आहे. तेव्हां टिळक फार पूर्वीपासून ख्रिस्तीमताचे अध्ययन करीत असावेत असे दिसते. 'वापाचे अश्रु' हे वैलापिक काव्य टिळकांनी त्यांचा पहिला मुलगा, विद्यानंद हा अल्पवयातच मृत्यु पावला त्याच्या निधनावर रचले आहे. त्याकाळी मराठीत विडंवन, विलापिका इत्यादि इंग्रजी काव्यप्रकार आले होते. त्यांच्या अनुकरणाने कदाचित् टिळकांनी ही विलापिका लिहिली असावी. ही विलापिका त्यांनी १८८८ साली प्रसिद्ध केली आहे. पुढे १९०९ साली त्यांचे वृद्ध कविमित्र सच्चिदानंद साठे यांचा वामन हा होतकरू चित्रकार पुत्र दिवंगत झाला त्यावर त्यांनी याच नांवाची दुसरी विलापिका आळविली. या दोन्ही विलापिका एकाच नांवाच्या असल्या तरी परस्परापासून अगदी स्वतंत्र आहेत. जुन्या 'वापाच्या अश्रू'त चिंतनपरता नाही, रुदनपरता आहे. परंतु भावोर्मींचा कल्लोळ अधिक उत्कट व वळकट आहे;—

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वा मरणा ! तुज हात जोडतो ने मज वाळा जवळी
नको मला संसार ! पुरे जरि मी त्या तनया कवळी.

स्तनी फुटोनी पान्हा फुटते धाय धाय तव माता
पाळण्यात रे ! तुला शोधिते इकडे तिकडे ताता.

झोप न ये तिज तुझ्या वाचुनी, वेळोवेळी पाही—
कुशींत माझा बाळ लाडका आहे किंवा नाही.

निज हस्तांचा करूनि पाळणा रात्रभरी तुज घेई
अरे कृतघ्ना ! तिची दया तुज कैशी आली नाही.

ही विलापिका टिळक रचत असताना लोकमान्य टिळकांचा राजकीय क्षितिजावर उदय झाला होता. त्यांच्या अकुतोभय वृत्तीचा साऱ्या देशभर गौरव होत होता. त्याचा अप्रत्यक्ष निर्देश या विलापिकेच्या पुढील साक्यात आहे;—

स्वदेश सेवन हेतु धरोनी निराश झालो होतो
तुझें वदन पाहता पुनरपी ईर्षोद्भव मज हो तो

जी सेवा मज न घडे माझ्या प्राणप्रिय देशाची
घडविन ती तव करे उडी ही पुढची होती याची
म्याडा ! ही मम इच्छा जाणुनि काय पळोनी जाशी ?
टिळक कुलोद्भव तूं तूज वाळा ! नुपजे भीती ऐशी !

टिळकांच्या उमेदवारीच्या काळातील या विलापिकेत असंख्य दोष आहेत. परंतु तिच्यात भावनेची उच्छृंखळता असल्यामुळे ती अधिक हृदयस्पर्शी झाली आहे. नवीन 'बापाच्या अश्रूं'त तत्त्वचिंतन व आत्मसांत्वन आहे. त्यात शोकाला पायबंद घातला आहे. त्यामुळे ही विलापिका उदासरम्य व धीर गंभीर उतरली आहे;—

उपनिषदांची धेनू दोही गोपाळांचा राजा,
पिई दुग्ध तें पार्थ, म्हणे, की मोहा आता जा जा !

ही या विलापिकेतली साकी या सुप्रसिद्ध सुभाषितावर आधारली आहे;—

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपाल नंदनः
पार्थोवत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत्

यावरून ख्रिस्तीमताची दीक्षा घेतल्यानंतर सुद्धा टिळकांना वेद, उपनिषदे गीता इत्यादिकातील अमृतमधुर तत्त्वज्ञान किती प्रिय होते ते स्पष्ट होईल.

'यशवंतराव महाराज काव्य', 'देवीचा प्रसाद', 'गणपतिस्तव', 'गणपति मेळयाची पदें', 'गोविमोचन नाटक', 'गोरक्षणावरील पद्यें', 'मूर्तिपूजा', 'नानाजी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कापशीकरांवरील पदें', उपासनेचे अभंग', या वाङ्मयाच्या नांवावरूनच त्यांच्यातील विषयाची व त्यांच्या स्वरूपाची कल्पना होते. यावरून एक निष्कर्ष सहज निघतो. तो हा की टिळक हे फार अगोदरपासून धर्म विचारक व तत्त्वजिज्ञासु होते. त्यांची मनोरचना भाविक होती. 'गंगा'. 'वीरकन्या', 'तीन विधवा', 'तिरशिंगराव' इत्यादि ललित साहित्य त्यांनी लिहिले आहे. पण ते अपूर्ण आहे किंवा साधारण आहे. त्यात त्यांचा आत्मा नाही. नागपुरास असतान प्रथम त्यांनी १८८९ मध्ये 'काव्य कुसुमांजलि' हे स्वकृत कवितेला वाहिलेले मासिक सुरू केले. परंतु ते पांच अंक निघून स्थगित झाले. मग त्यांनी १८९३ साली श्रीमंत आप्पासाहेब बुटी यांच्या आश्रयाखाली 'ऋषि' मासिक काढले. आणि त्याच साली जुन्या 'काव्य कुसुमांजली'ची जोड देऊन 'विविध विषय तरंगिणी' मासिकाचा आरंभ केला. परंतु ही नियतकालिके वर्गणीदारांच्या अभावी दोन तीन महिन्यांहून अधिक काळ टिकाव धरू शकली नाहीत. 'काव्य कुसुमांजली'त टिळकांच्या वदलत्या प्रतिभेची चूणूक दिसते. 'रस महोत्सव', 'शृंगार', 'स्त्रीजन प्रशंसा', 'काम व प्रेम' इत्यादि त्यांची स्फुट कविता तिच्यात प्रसिद्ध झाली आहे. या कवितेचे वळण निराळे आहे. 'वनवासी फुलांती'ल अनेक साक्या या नियतकालिकात 'शृंगार' या मथळयाखाली प्रसिद्ध झाल्या आहेत. नागपुरात टिळकांना श्रीमंत बुटीसारखा उदार आश्रयदाता भेटला होता. त्याने आपला धर्मशास्त्रांवरील प्रचंड ग्रंथसंग्रह संशोधनासाठी व संपादनासाठी टिळकांच्या आधीन केला होता. त्याच प्रमाणे साहित्याचे मार्गदर्शन करण्यासाठी हरि माधव पंडित व वामन दाजी ओक हे महाराष्ट्र भाषेचे निस्सीम उपासक लाभले होते. पंडित विविधज्ञान विस्ताराचे आणि ओक काव्य संग्रहाचे संपादक होते. त्यांचा संस्कृत, प्राकृत इंग्रजी या तीन्ही भाषातील साहित्याचा व्यासंग होता. त्यांच्या सान्निध्यात टिळकांना साहित्यविषयक नवीन दृष्टि प्राप्त झाली. नाशकाचे लेले हे शास्त्री होते. त्यांचा दृष्टिकोण जुना होता. पंडित व ओक नव्या पद्धतीने शिकलेले होते. त्यांचा दृष्टिकोण नवा होता. टिळक जुन्या पठडीत पढलेले असून देखील त्यांच्या कवितेत आज घटकेचे अधुनातनत्व (modernism) आढळते, ते खरोखर विचारार्ह आहे. 'ऋषीं'त टिळकांनी 'धर्मसुधारणा व धर्मसंरक्षण', 'चातुर्वर्ण्य निर्णय', 'विवाह'' 'संध्या', 'वानप्रस्थ' इत्यादि धार्मिक विषयांवर लेखन केले आहे टिळकांनी यावेळी म्हणजे १८९३ साली श्रीमद् भगवत्गीतेवर 'सुबोध गीता ही ओवीबद्ध प्राकृत टीकाहि रचली होती. टिळकांचे या काळचे गद्यपद्य लेखन मोठे डौलदार व भारदस्त आहे. कदाचित् त्यांच्यातील प्रौढ विचारांचा हा परिणाम असावा. आपल्या 'संपादकीयात'त ते सांगतात;-'यापुढे आमचे अव-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शिष्ट आयुष्य धर्माध्ययन, धर्मबोध, धर्माचरण व धर्मप्रसारण यातच जाणार. आम्ही आपल्या अनन्य पराक्रम परमपूज्य ऋषिवरांचे नाव राखू आम्ही श्रुति स्मृति पुराणादि ग्रंथांस प्राकृत रूप देण्याचा यत्न करू, आपल्या संस्काराविषयी खरे शास्त्रार्थहि देऊ, व त्या शास्त्रार्थांची व रूढींची तुलना करू. इतके करून अवकाश राहिल्यास गुह्यात् गुह्यतर वेदान्त मतासहि बाहेर आणून ठेवण्याचा यत्न करू.' टिळक हे सुरुवातीपासूनच धर्मप्रवण होते ते यावरून लक्षात येईल. टिळकांचे संस्कृतावर प्रभुत्व होते व त्याचे मराठी भाषान्तर सहज लीलेने करण्यात ते निपुण होते हे पुढील उदाहरण सिद्ध करील. पूर्वीची ज्ञानी गुरूंची आणि निष्ठावंत शिष्यांची परंपरा आज राहिली नाही हे सांगताना त्यांनी, पुढील सुभाषित उद्धृत केले आहे:—

एणः क्रीडति शूकरश्च खनति द्वीपीच गर्वायते
  क्रोष्टा क्रंदति वल्गतेच शशको वेगाद्द्रुरूर्धावती
निःशंकः करिपोतकस्तरुलतामुन्मोटते लीलया
  हं हो सिंह विनात्वयाद्य विपिने कीदृग्दशा वर्तते

त्याचा हा मराठी उलथा पहा;—

हा खेळे मृग, हा वराह खणतो, हस्ती मदा दावितो
  कोल्हा ओरडतो, ससा वरळतो, धावे रुरू, वाळ तो—
हस्तीचा तरुंना लतांस उपडी निःशंकलीलार्थ रे !
  सिंहा ! हंत ! तुझ्याविना गति वनीं झाली कशी ही वरें ?

टिळक या सुमारास 'जगन्मित्र' या काव्यमय नांवाने आपल्या स्फुट कविता प्रसिद्ध करू लागले होते. या टोपण नांवात ध्वनि होता. पुढे यासंबंधी १८९७ साली 'बालबोध मेव्यात टिळक लिहितात, "जगाचा मित्र प्रभु येशू आहे. मनुष्य स्वतः दुर्बल असून तो कधीकाळी जगन्मित्र झालाच, तर प्रभू येशूच्या विभूतीने होणार आहे." यावेळच्या कवितेवर 'मराठी भाषेची सद्यःस्थिति' या लेखात मोतीबुलासा लिहितात;— "रा. रा. नारायण वामन टिळक यांनीहि बरीच लहान लहान काव्ये छापून प्रसिद्ध केली आहेत. नागपुरास असताना त्यांनी 'काव्य कुसुमांजलि' नांवाचे एक छोटेखानी फक्त कविता विषयक मासिक काढले होते. इतर कवीच्यापेक्षा टिळकांच्या कवितेत प्रसाद अधिक दृष्टीस पडतो. ती निरनिराळ्या रसांनी थबथबलेली असल्यामुळे यमक, अलंकार किंवा भाषासौन्दर्य यांचे विशेष साहाय्य नसूनहि अगदी साहजिक रीत्या वाचकांचे मन मोहित करते' (सुविचार समागम मे. १८९८)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

—३—

इ. स. १८९४ मध्ये टिळक राजनांदगांवाला संस्थानाच्या नौकरीत सुस्थितीत होते. असे असताना त्यांनी एकदम एकाएकी १८९५ च्या फेब्रुवारीत नव्या मताची दीक्षा कां घेतली असे कित्येकांना कोडे पडते. वस्तुतः टिळक नाशकास विद्यार्थी असताना पासूनच भिन्न भिन्न धर्ममतांच्या ग्रंथांचे वाचन करू लागले होते. मात्र ते केवळ ज्ञान प्राप्तीच्या व जिज्ञासेच्या स्वरूपाचे होते. 'ज्ञानोदय' या ख्रिस्ती मतपत्राला त्यांनी 'N.V.T. ब्राह्मण' या सहीने १५।९।८७ रोजी संगमनेराहून पाठविलेले एक पत्र उपलब्ध आहे. त्यात त्यांनी 'बाप्तिस्मा' या शब्दाचे समर्थन केले आहे. त्याच प्रमाणे त्यांचा रे. बाबा पदमनजी यांच्याशी पत्रव्यवहार होता. बाबा आपल्या 'अनुभव संग्रहा'त टिळकांच्या पत्रव्यवहारा विषयी म्हणतात, "कांही दिवसां मागें एका अनोळखी विद्वान पंडिताकडून मला पत्र आले. त्यांत असे लिहिलें आहे की, 'अरुणोदय व इतर माझ्या पुस्तकांत शब्दलालित्य किंवा शास्त्रदृष्ट्या कोणताहि दुसरा गुण नसून मला ती शेंकडोवेळां पुनः पुनः वाचावीं असें वाटतें. त्यांत खरा कळवळा, खरी भक्ति, साधेपणा व निरिच्छता आहे" (स्मृति चित्रें भाग १ पृष्ठें ६९ व १४१) यावरून टिळकांचे दीक्षा ग्रहण पूर्ण विचारान्ती झाले होते हे स्पष्ट आहे; आणि त्यांना कोणत्या प्रकारचे साहित्य अपेक्षित होते तेहि उघड आहे. राजनांदगांवा सारख्या हिंदी भाषी मुलुखात टिळकांच्या वक्तृत्व समारंभादि चळवळी चालू होत्या. परंतु त्यांचा एकांताचा सारा वेळ बायबलच्या वाचनात, छत्तीसगडातील युरोपीय मिशनऱ्यांच्या सहवासात आणि ख्रिस्त धर्मानुयायांशी वादविवाद करण्यात व्यतीत होत होता. याच सुमारास बुशनेलचें chacracter of jesus हे पुस्तक त्यांच्या वाचनात आले. या पुस्तकाचा त्यांच्या मनावर विलक्षण प्रभाव पडला. एकदा टिळक इंटरने प्रवास करीत होते. त्यांच्या डब्यात एक गोरे मिशनरी होते. हे बहुधा रे. हिल् किंवा रे. वॉर्ड यांपैकी कुणीतरी असावे असा टिळकांच्या चिरंजीवांचा कयास आहे. त्यांच्याशी धर्मविषयक संभाषण करताना टिळकांनी त्यांना आपल्या नवीन धर्माची कल्पना सांगितली. ती ख्रिस्ती मताशी समान असल्यामुळे त्या मिशनरींनी टिळक लवकरच ख्रिस्तानुयायी बनतील असे भाकीत केले आणि ते खरे ठरले.

टिळकांना धर्म या विषयाची स्वभावतःच आवड व ओढ होती. आपल्या सनातन धर्माचे मूळ वैदिक शुद्ध स्वरूप मलीन होऊन त्यावर कर्मकांडाची किटे व पुटे चढली आहेत. शिवाय त्यात नाना वेडगळ विचारांची व चमत्कारिक आचारांची भर पडली आहे. शास्त्रापेक्षा रूढीच बलवान झाली आहे. टिळकांच्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लहानपणी व तरुणपणी या विपरीत रीतींचा घरादारात व घरावाहेर बराच जाच होता. टिळकांना त्याचा उवग आला असावा. तसेच त्यावेळी ख्रिती मिशनऱ्यांचे समाजसेवेचे कार्यहि नवखे व अनोखे होते. सातां समुद्रापलिकडून स्वत:चे घरदार सोडून या देशात जनसेवा करण्यास आलेल्या त्यागी ख्रिस्त्यांविषयी लोकांच्या मनात आदरमिश्रित कौतुक होते. शाळा, कॉलेजे, इस्पितळे, अनाथालये इत्यादि त्यांची सेवाकार्ये जनतेपुढे साक्षात् उभी होती. टिळकांना त्यावद्दल आदर व अभिमान वाटला असावा. वस्तुत: तसे कार्य करण्याकरिता त्यांनी सुधारकाची भूमिका घ्यावयास हवी होती. परंतु समाजात सुधारणेपेक्षा भंजनच अधिक होत आहे हे त्यांच्या लक्षात आले असावे. आणि म्हणून त्यांनी ख्रिस्तीमताची दीक्षा घेतली असावी. ख्रिस्त देवांच्या पुण्यपावन चरित्रात त्यांना प्रीति, शांति व समाधान यांचे दर्शन घडले.

नवीन मताच्या दीक्षेचे ग्रहण करणे ही टिळकांच्या व्यक्तिगत विश्वासाची वाव होती. त्यासाठी जुन्या समाजाने हळहळण्याचे कांही कारण नव्हते. परंतु त्यावद्दल रक्ताचा संवंध असणाऱ्या टिळकांच्या निकटच्या नातलगांना व आप्तमित्रांना त्यांचा राग येणे व वाईट वाटण स्वाभाविक होते. मानवी स्वभाव लक्षात घेता त्यावद्दल त्यांना दोष देता येत नाही. टिळकांचे कनिष्ठ वंधु सखारामपंत सांगतात, "नाना ख्रिस्ती झाल्याची वातमी वर्तमान पत्रात प्रसिद्ध झाली, व ती आम्हां सर्वांच्या दु:खास कारणीभूत झाली. नानाला पुन्हा ब्राह्मण धर्मात घेण्याची मी व आमचे श्रीयुत वाळ गंगाधर टिळक यांनी खटपट चालविली. त्यावेळी मी पंढरपुरी वकील होतो. नानांला पुन्हा पावन करून घेण्यावद्दल काशी क्षेत्रातील शास्त्री व ब्रह्मवृंद याची परवानगी मिळविली. नाना त्यावेळी पंढरपूर येथेच होते. तेथील ब्रह्मवृंदाचीहि या गोष्टीला सम्मति मिळविली." (मनो. जून १९१९) परंतु टिळकांचा निश्चय ढळला नाही. यावरून टिळक मनोभावाने ख्रिस्ती वनले होते हे स्पष्ट आहे.

टिळक ख्रिस्ती वनले. परंतु त्यांनी दुसरा विवाह संवंध केला नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. १९ जुलै १९०० रोजी त्यांच्या पत्नी व त्यांचे चिरंजीव ख्रिस्तमतानुयायी होईतो त्यांनी त्या दोघांचा विरह सहन केला यात त्यांची एकनिष्ठा व खरी प्रीति व्यक्त होते. या वावतीत 'माझें मला द्या' या त्यांच्या कवितेवर एक टीप आहे. ती लक्षणीय आहे. "एका एकनिष्ठ पतीस, आपल्या विरहांतरित पत्नीचा त्याग करून दुसरा संवंध करण्याविषयी एकाने सूचना केली. त्या सूचनेला हे त्या विरहव्याकुल, दीन व प्रेमळ पतीचें उत्तर आहे" (सुविचारसमागम मे १९८९). परमतात प्रवेश केल्यामुळे टिळकांची आर्थिक स्थिति सुधारली असेहि नाही, वस्तुत: नागपुरास वुटींकडे असताना

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व त्यानंतर राजनांदगांवला संस्थानी नोकरीत असताना त्यांना पैश्यांची कमतरता नव्हती. तेव्हां टिळक कनक किंवा कामिनी यांच्या प्रलोभनाला वळी पडले व ख्रिस्ती मतात दीक्षित झाले असे म्हणता येत नाही. आरंभापासून त्यांचा जो धर्मविचार चालू होता, शांति सुखाचा जो शोध सुरू होता आणि सत्याची जी साधना मार्गक्रमण करीत होती, तिचा तो आनंददायक शेवट होता.

ख्रिस्ती पंथात प्रवेश केल्यावर टिळक आरंभी नगराला, पुढे राहुरीला व अखेरीस साताऱ्याला धर्मोपदेशक पदावर अधिष्ठित झाले. आयुष्याच्या अखेरी अखेरी ते "ख्रिस्ती संन्यासी" वनले होते. टिळक ख्रिस्ती पंथात शिरण्यापूर्वी हिंदी ख्रिस्ती समाजाची दशा मोठी दयनीय होती. दर रविवारी उपासनेच्या प्रसंगी भजनालयात म्हणण्यात येणाऱ्या त्यांच्या भजनाची भाषा घेडगुजरी होती. आणि ती भजने गाताना पाश्चात्यांच्या गान पद्धतीचा अवलंव करण्यात येई. इंग्रजी भाषा अवयवांच्या विकरणावर (stress) वसवलेली आहे. उलट मराठी भाषा वर्णोच्चार होण्यास लागणाऱ्या काळावर विसंवून आहे. त्यामुळे हे भजनगायन हास्यास्पद होई. पाश्चात्य मिशनऱ्यांच्या लक्षात ही उणीव येत नसे. टिळकांनी 'भजन संग्रह', 'प्रभूची प्रार्थना', 'अभंगांजलि'* 'ख्रिस्तायन' इत्यादि भक्ति वाङ्मय निर्माण करून हिन्दी ख्रिस्त्यांची व मराठी वाङ्मयाची फार मोठी सेवा वजावली आहे. टिळकांच्या 'भजनां'च्या चाली प्राचीन पदांच्या आहेत. त्यांच्या 'अभंगा'त तुकारामांच्या वाणीतला प्रसाद व प्रेमळपणा आहे. तुकाराम महाराज हे टिळकांचे अत्यंत आवडते कवि होते. तुकारामांचा फटकळ-पणा व सडेतोडपणा मात्र टिळकांच्या वाणीत नाही. याला कारण टिळकांची भूमिका रूढि भंजकाची नव्हती. ते प्रेममार्गाचे पथिक होते. तुकारामांच्या भक्तीला विरक्तीची जोड आहे. परंतु टिळकांची प्रीति प्रवृत्तिपर होती. जुन्या संत साहित्यात व टिळकांच्या भक्तिपर काव्यांत जो भेद आहे तो येथेच आहे. टिळकांचे 'वनवासी फूल' पूर्वी कुसुम गुच्छां'त 'एका फुलाचा इतिहास' या नांवाने प्रसिद्ध झाले होते. या भक्तिमय व ज्ञानमय काव्यात वास्तविक टिळकांच्या दोन मनोवृत्तींचा सुसंवाद आहे. 'फूल' प्रेमळ खरे. परंतु 'वनवासी' आहे. 'कवि'हि प्रेमळ आहे. परंतु तो 'जना'त राहणारा आहे ख्रिस्ती पंथात काम व कावाडकष्ट (work and labour), प्रेम व गृहस्थाश्रम (love and home) आणि सेवा व प्रार्थना (service and prayer) या तीन गोष्टींना फार महत्त्व आहे. त्यांचेच विवेचन टिळकांनी 'वनवासी फुला'त केले आहे.

---

* १।२।१९१७ ते २९।५।१९१९ या अवधीत टिळकांच्या मुखातून ३०३ अभंग स्रवले असून ते सर्व भक्तीने ओतप्रोत आहेत.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

टिळकांनी हे तत्त्वज्ञान काव्यमय केल्यामुळे ख्रिस्ती समाजात 'वनवासी फुला'ला 'गीता' मानण्यात आले आहे. 'ख्रिस्तायनां'त टिळकांनी जुन्या ओवीचा आश्रय केला आहे. श्रीधर व महीपति यांच्या 'राम विजय', 'कृष्ण विजय', 'भक्ति विजय' इत्यादि ग्रंथांप्रमाण हा 'ख्रिस्त विजया'चा ग्रंथ आहे. तो पूर्ण होण्यापूर्वी टिळक ख्रिस्तवासी झाले. तेव्हां त्यांच्या पत्नींनी व चिरंजीवांनी तो ग्रंथ पूर्ण केला

आपण ख्रिस्तमतानुयायी असलो, तरी हिंदी आहोत. आपली संस्कृति हिंदी आहे. हिंदुस्थान हा आपला देश आहे. आपण येथेच जन्माला आलो आहोत व येथेच राहणार आहोत. तेव्हां आपले विचार, आचार व उच्चार त्या हिन्दी परंपरेला धरून हवेत ही जाणीव टिळकांनी हिन्दी ख्रिस्ती समाजात उत्पन्न केली. देशसेवेच्या दृष्टीने हे त्यांचे कार्य महनीय नाही असे कोण म्हणेल ? ख्रिस्तदेव व महम्मद पैगंबर साहेब हे बुद्धदेवाप्रमाणे या भारतवर्षात अवतीर्ण झाले असते, तर येथील दशावतारात आणखी दोन अवतार म्हणून त्यांचाहि समावेश झाला असता. मानवधर्म हा येथून तेथून एकच आहे. वस्तुतः मतभिन्नता ही त्याच्या आड येण्याचे कारण नाही. आपल्यात द्वैत, अद्वैत, द्वैताद्वैत, विशिष्टाद्वैत इत्यादि भिन्न मते जशी आहेत तशीच ही मते आहेत अशी येथील लोकांची धारणा झाली असती.

टिळकांनी ख्रिश्चन मताचा स्वीकार केला तेव्हां आरंभी आरंभी त्यांच्या कवितेत त्या मताला वरेच स्थान असे. त्यांच्या 'कवि' या कवितेत 'मोझेस'चा उल्लेख असलेली एक आर्या होती;—

काल अनाद्यन्त तरी प्रारंभी शब्द हा कसा आला
स्वर्गी जाउन किंवा काय विचारूं तयाच मोशाला ?

*'प्रारंभी' ही त्यांची कविता बायबलवरच आधारली आहे. या कविता रसिकांना प्रिय नव्हत्या असे नाही. संपादकांनी त्यांना प्रेमाने व आनंदाने प्रसिद्धिहि दिली आहे. परंतु तो काळ लक्षात घेऊन टिळकांना प्रेमाचा व सुहृद्भावाचा इषारा दिला आहे. मनोरंजनात असा एक इषारा होता. त्याला लक्ष्य करून सुविचार समागम म्हणते, "मासिक मनोरंजनाने सुचविल्याप्रमाणें टिळकांनी जियें तिथे आपले बायबलचे घोडे पुढे ढकलू नये. निदान ते नेमस्त-पणे ढकलावें" (सु. स. जुलै १८९८) वि. ज्ञा. विस्ताराने 'भजन संग्रहा'वर अभिप्राय दिला आहे;—"रे. टिळक ख्रिस्ताच्या कळपात शिरले असल्यामुळे प्रस्तुत पुस्तकात ख्रिस्त माउलीचेच भजन असल्यास त्याबद्दल कोणास आश्चर्य अथवा

*'प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी उत्पन्न केली. (सु. स. मे १८९८)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खेद वाटण्याचे कारण नाही. यातील कांही पद्ये सरस व सरळ उतरली आहेत.' टिळकांच्या कांही अभंगाचे, पदांचे व कवितांचे रे. विन्स्लो यांनी इंग्रजीत भाषान्तर केले आहे. ते देखील लोकप्रिय आहे. तेव्हा टिळकांच्या कवित्वाची खास प्रशंसा करण्याचे प्रयोजन नाही, मात्र पुढे पुढे टिळकांच्या कवितेला निधार्मिक म्हणजे Seculer स्वरूप आले. तिच्यात ईश्वराच्या अस्तित्वावरील श्रद्धेचा सुगंध आहे आणि भक्तिभावनेचा अस्फुट स्वर आहे. तो दिक्कालातीत असल्यामुळे कुणालाहि प्रिय होण्या जोगा आहे. त्यात विशिष्ट धर्ममत नाही.

कोणताहि धर्म हा मूळात शुद्धच असतो. तो सत्‌चा पुरस्कार करीत असतो आणि असत्‌चा तिरस्कार करीत असतो. त्या धर्मांच्या अनुयायात काळाच्या ओघात अनिष्ट आचारा विचारांचे स्तोम माजते आणि त्याचा प्रवाह गढूळ होतो. हा अनुभव टिळकांना त्यांच्या नवीन धर्ममतातहि आला. पोटापाण्यासाठी परक्याची लाचारी पत्करून स्वकीयांचा तिटकारा करणाऱ्या विषयी त्यांना उद्वेग होता. तो त्यांनी आपल्या एका गीतात उपहासाच्या आश्रयाने प्रकट केला आहे;—

गोमाजि तिमाजीचा मी जाहलो मजेचा जॉनी
जॉनी मी पुरता जॉनी हें कृष्णवदन वगळोनी
निज जाति बंधु पाहोनी मम पित्त जाय खवळोनी
मी पळतो मागे मागे जन युरोपीय वळखोनी (मनो. १९०९)

हिन्दी ख्रिस्त्यांना आपल्या स्वत्वाची जाणीव करून देण्यासाठी टिळकांनी 'प्रियकर हिंदुस्थान' ही कविता लिहिली आहे. तिच्यात शेवटचा चरण 'ख्रिस्ती नच तो जाण' असा होता. ही कविता टिळकांनी प्रथम 'बालबोध मेव्या'त प्रसिद्ध केली होती. ती हितकर वाटल्यावरून वासुदेव गोविंद आपटे यांनी 'आनंदा'त पुन्हा प्रसिद्ध केली. आणि **'ख्रिस्ती नच तो जाण'** हा चरण बदलला व **'हिन्दी नच** तो जाण' असा केला. या कवितेखालील टिपेत आपटे सांगतात, "या ठिकाणी मूळच्यात 'ख्रिस्ती' असा शब्द होता. पण हे वाक्य सर्वांना लागू पडावे म्हणून मी त्या ठिकाणी 'हिन्दी' हा शब्द घातला आहे. (आनंद सप्टें. १९०८) टिळकांना हा शाब्दिक फेरफार इतका पसंत पडला की त्यांनी पुढे आपली कविता पुस्तक रूपाने काढली तेव्हा 'प्रियकर हिंदुस्तान' हें मूळ शीर्षक बदलून ते 'प्रियकर हिन्दीस्तान' असे केले. मिशन मध्ये टिळकांचे सारे आयुष्य सुरळित व सुखी गेले असे नाही. तेथेहि भलेबुरे लोक होते. साताऱ्याच्या वास्तव्यात त्यांना फार त्रास झाला. पैशाच्या बळावर ख्रिस्ती धर्ममताची स्थापना करण्याची पद्धति त्यांना अमान्य होती. ते म्हणत,—"बुद्ध, महंम्मद पैगंबर, शंकराचार्य

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि ख्रिस्त यांच्या पाशी पैसा नव्हता. हिंदीस्तान धर्मभूमि आहे, संतभूमि आहे. धार्मिक मनुष्याच्या पोटाला आपल्या देशात खात्रीने अन्न मिळेल. ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी पगार न घेता धर्मप्रसार करावा. देव त्यांचा योगक्षेम चालवील.'' (मनो. जून १९१९) युरोपातील ख्रिस्ती राष्ट्रांनी आपसात १९१४ चे महायुद्ध चालवलेले पाहून त्यांचा अंतरात्मा तळमळत असे. या सुमारास लिहिलेल्या 'माझे नांव लढाई' या कवितेत ते सात्विक संतापाने म्हणतात,–

असतिल साथी जगांत जितुक्या त्याहुन मी घनघोर
मूळ नराच्या हृदयीं माझे, नांव तयाचे वैर !
स्वार्थ, कोप, अभिमान, कलह, वध माझी सर्व फळे ही
मी मृत्यूचे जीवन केवळ ! माझे नांव लढाई !
नीति, प्रीति, क्षमा, शांति हे शब्द यापुढे विसरा,
फेकुनि द्या ते कोश ज्यामधे असेल असला कचरा !
सकल कलांना, ज्ञानधनाला, अथवा धर्मालाही–
मुठीत माझ्या धरणारी मी, माझे नांव लढाई ! '

समतेचा, शान्ततेचा व बंधुतेचा संदेश देणाऱ्या 'देवदूता'च्या अनुयायांनी जागतिक संग्राम माजवावा हे टिळकांसारख्या खऱ्या ख्रिस्त भक्ताला पटले व आवडले नाही. त्यांची ख्रिस्त देवावरील श्रद्धा अविचल राहिली. परंतु त्यांच्या नांवाने संगर माजवणाऱ्या ख्रिस्त्यांवरील त्यांचा विश्वास पार उडाला. ते म्हणूं लागले;–''नव्हे ख्रिस्ती । परि ख्रिस्त ख्रिस्त'' याच सुमारास टिळकांच्या मनात एका नव्या मताची कल्पना उद्‌भूत होऊ लागली. या मताला त्यांनी 'देवाचा दरबार' हे नांव दिले आहे 'अरुणोदय' या आपल्या लेखात ते सांगतात;–''देवाचा दरबार म्हणजे ख्रिस्ती चर्च नव्हे. मनुष्या प्रीत्यर्थ स्वतःला खांबाला खिळून घेणारा व तेथेच 'आता पूर्ण झाले' म्हणणारा 'मनुष्य पुत्र' प्रभु येशू ख्रिस्त, ज्याला धर्महि म्हणत नाही व चर्चहि म्हणत नाही, तर 'देवाचे राज्य' हेच अन्वर्थक नांव देत आहे, असे नवजीवन व तत्प्रीत्यर्थ स्थापिलेली संस्था म्हणजे 'देवाचा दरबार'. साऱ्या जगाला हा दरबार पाहिजे आहे. ख्रिस्ती राष्ट्रांना तर आधी पाहिजे आहे. हिंदुस्थानांला त्याच्याहि आधी पाहिजे आहे. कारण नुमतेच स्वराज्य काय, पण साऱ्या जगांत 'शान्तीच्या राजाचे' राज्य स्थापित करून जगाच्या गुरुस्थानी विराजमान होण्याचे भाग्य हिन्दुस्थानचेच आहे. ही आकाशवाणी आम्हांला नित्य ऐकू येत आहे'' (प्रभात जुलै १९१८) हा लेख लिहिला त्यावेळी टिळक आजारी होते. त्यांना मूळव्याध होती. दिवसें दिवस

(पृष्ठ २७ वर)

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नव्या जगात

(लेखांक ४ था)

लेखक–प्रा. गो. मा. कुलकर्णी
सेंटलुई, अमेरिका.

२१ तारखेला सकाळी ८ वाजता आम्ही शिकागोहून ग्रे हाउन्ड बसनं कँप मिनिवाकाला जाण्यासाठी निघालो. ग्रे हाउन्ड बस कंपनी अमेरिकेतील सर्वात मोठी व एक प्रकारे एकमेव राष्ट्रीय बस कंपनी आहे. न्यूयॉर्क पासून तो थेट सान्फ्रान्सिस्को पर्यंत ग्रे हाउन्ड बसनं जाता येतं. भाडेहि रेल्वे पेक्षा कमी. या बसेसनंहि रेल्वेला हादरा दिला आहे. शिकागोहून अमेरिकेतल्या सर्व मोठमोठ्या शहरी बसेस् जातात. दर पांच मिनिटाला कुणीकडे तरी जाणारी बस सुटते. बसेस अतिशय चांगल्या, सुखप्रद आणि एअरकंडिशन्ड असतात. ताशी साठ मैल वेगानं धावतात. ठरलेल्या ठिकाणी ठरलेल्या वेळी पोंचतात. आमची बस ८ वाजता शिकागोहून निघाली. निघताना ड्रायव्हरनं 'बारा वाजून पस्तीस मिनिटांनी आपण अमक्या ठिकाणी पोंचू तिथे लंच साठी वीस मिनिटं वेळ देण्यात येईल' असं सांगितलं आणि खरोखरच बस एका कॅफेटेरिया पुढे थांबली तेव्हां १२–३५ च झाले होते.

'मॉटेल'

आमचा हा प्रवास फार मजेचा झाला. मिशिगन राज्याच्या फळझाडांनी समृद्ध अशा प्रदेशातून आमची बस धावत होती. दुतर्फा झाडी व झाडं. धूळ कुठेहि नाही, सडका अतिशय चांगल्या. वाटेत लागणारी गांवं स्वच्छ व टुमदार. या प्रवासात एक नवीन गोष्ट कळली. जागोजाग अमुक अमुक मॉटेल (Motel) अशा पाट्या दिसल्या. मॉटेलची पहिली पाटी पाहिली तेव्हां वाटलं H च्या ऐवजी M पडलं असेल. पण पुढे मॉटेलच्या अनेक पाट्या लागल्या. मॉटेल ही काय भानगड आहे? तपासा अंती कळलं की मॉटेल ही एक प्रकारची धर्मशाळा आहे. तिथे खोली भाड्यानं मिळते. स्वयंपाकघर असतं, भांडी असतात. एकदोन दिवस राहून स्वयंपाक करून जेवायचं व जातांना भांडी स्वच्छ करून ठेवायची. मॉटेलची पद्धत गेल्या दहा वर्षात सुरू झाली आहे. हॉटेलं फार महाग झाली आणि 'टिप्'नं बेजार केलं. तेव्हां ही सोयिस्कर पद्धत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निघाली. इथे टिप् वगैरेची भानगड नाही. स्वस्तात स्वतंत्रपणे सर्व करता येतं. हे कळून मला मोठी मौज वाटली. आपणच पसारा वाढवायचा, त्यात गुरफटून पडायचं आणि शेवटी बेजार होऊन जुनीच पद्धत नव्या नांवाखाली सुरू करायची. आपल्या देशात आपण धर्मशाळा मोडून सर्वत्र हॉटेलं सुरू करू त्यावेळी अमेरिकेत हॉटेला ऐवजी सर्वत्र मॉटेलं सुरू झालेली असतील.

बरोबर पावणे दोन वाजतां आम्ही मस्कीगत नांवाच्या ठिकाणी पोचलो. तिथे उतरतो तोच एका मार्गदर्शकानं सांगितलं की दहा मिनिटातच कँप मिनिवा-काला जाणारी खास बस येणार आहे. त्याप्रमाणे ती आली. तीत कॉन्फरन्सला जाणारे बरेच अमेरिकन प्राध्यापक होते. व आमच्या पैकी जे तिथे दुसरीकडे गेले होते त्या पैकी दोघे होते. आम्हीहि आत जाऊन बसलो. बहुतेक अमेरिकन प्राध्यापक सहकुटुंब होते. आम्ही 'तसेच' आहोत याची जाणीव झाल्या वाचून राहिली नाही. कोणत्याहि परिषदेला जाणाऱ्या प्रतिनिधींच्या बसमध्ये जसं वातावरण असतं तसंच इथेहि होतं. गप्पा–गोष्टी, विनोद वगैरेना ऊत आला होता. सव्वा तीन वाजतां कँप मिनिवाकाला पोंचलो. एका टेकडीच्या पाय-थ्याशी सरोवराच्या कांठावर बस उभी राहिली आणि आम्ही लाकडी दादरच्या सुमारे अडीचशे पायऱ्या चढून वर गेलो. वर जाताच प्रथम रजिस्ट्रेशन. अमेरिकेत हा शब्द फार वापरला जातो. कोणत्याहि परिषदेत किंवा कार्यक्रमात प्रथम विधि म्हणजे रजिस्ट्रेशन. रजिस्ट्रेशन म्हणजे विशेष कांही नाही. नांव, गांव, राष्ट्रीयत्व पत्ता वगैरे लिहून देऊन परिषदेच्या कामकाजाचे कागद व आपल्या नांवाचा बिल्ला घ्यायचा. अमेरिकेत आपलं नांव कोटावर लावण्याची भानगड फार आहे. साध्या पार्टीला गेलं तरी कागदावर नांव लिहून टांचणीनं कोटावर लावावं लागत. मग प्रत्येकजण नांव वाचून 'oh, you are kulkarni from India, I am (आपल्या कोटावरील नांवाकडे बोट दाखवीत) John from California. Glad to meet you.' वगैरे म्हणतो. मग आम्हीहि 'oh, you are John from California······' वगैरे म्हणायला लागलो.

कँप मिनिवांका

कँप मिनिवांका हे फार रम्य ठिकाण आहे. लहानशा टेकडीवर दोन सरोवराच्या मधे वसविलेलं आहे. एकीकडे स्टोनी लेक नांवाचं सरोवर तर दुसरीकडे लेक मिशिगन. स्टोनी लेकमधे सारखी नौकाक्रीडा व स्कायिंग (Skiing) चालत असे. स्कायिंग हा फार मजेदार प्रकार आहे. मोटार बोटीला साखळीनं एक विशिष्ट प्रकारची फळी बांधण्यात येते. आणि त्या फळीवर एक माणूस उभा राहतो. बोटीला बांधलेल्याच एका दोराच्या साहाय्यानं तो आपला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तोल सांभाळतो. बोट भर वेगात सुरू करण्यात येते आणि हा माणूस फळीवर उभा राहून पाणी नांगरीत गेल्या सारखा जातो. स्कायिंग पाहायला फार मजेदार असतं पण करायला तितकंच कठीण. पुष्कळ मुलीहि स्कायिंग करीत होत्या.

मिनिवांका हे रेड इंडियन नांव आहे. या भागात पूर्वी रेड इंडियनांची वस्ती होती. आता त्यांचा मागमूसहि नाही. अमेरिकनांनी त्यांचा पूर्ण निःपात केला आहे. कांही ठिकाणी नमुन्यासाठी म्हणून राखून ठेवलं आहे. डॅन्फोर्थ फाउन्डेशनचे संस्थापक विलियम् डॅन्फोर्थ यांनी ही जागा विकत घेऊन इथे कांही बंगले, सभागृह व लाकडी केबिन्स बांधविल्या आहेत. उन्हाळ्यात डॅन्फोर्थ मंडळी इथे राहायला येते आणि गेल्या कांही वर्षापासून डॅन्फोर्थ फाउन्डेशनची फेलोशिप ज्यांना मिळाली असेल त्या सर्व प्राध्यापकांची एक आठवडाभर कॉन्फरन्स भरविण्यात येते. अशाच कॉन्फरन्स साठी आम्ही गेलो होतो.

आमची राहण्याची व्यवस्था लाकडी केबिन्स मधे करण्यात आली होती. केबिनचा वरचा अर्धाभाग उघडाच होता. कांही ठिकाणी कॅन्व्हॉसचे पडदे होते. सभोवताली गर्द झाडी. उन्हाळा असून देखील रात्री अंगात दोन स्वेटर्स, पायात उलन पायमोजे, डोक्याला मफलर आणि वरून तीन ब्लँकेट्स पांघरून झोपावं लागत असे. दिवसा मात्र विशेष थंडी भासायची नाही. सुदैवानं आम्ही गेल्या नंतर थंडी थोडी कमी झाली. म्हणजे एक स्वेटर व दोन ब्लँकेट वर काम भागायला लागले. प्रत्येक केबिन मधे तीन अमेरिकन व आमच्या पैकी एकजण अशी राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. मुद्दामच आम्हा सर्वांना अमेरि-कनामधे वाटून देण्यात आलं होतं.

परिषदेची चोख व्यवस्था

परिषदेला सुरूवात २१ ऑगस्ट रोजी ५–४५ वाजतां जेवणाच्या कार्य-क्रमानं झाली. आणि रविवार ऑगस्ट २७ रोजी ११–३० वाजता चर्च मधील प्रार्थनेनं तिचा शेवट झाला. रोज भरगच्च कार्यक्रम असे. प्रत्येक कार्यक्रमाची घंटा होत असे. सकाळी ७ वाजतां उठण्याची घंटा व्हायची. ७–४५ ला ब्रेक-फास्ट, ९ वा. पहिले व्याख्यान, १०–१५ ला कॉफीची सुटी. १०–४५ ला दुसरे व्याख्यान, १२ ला सुटी. १२–१५ ला लंच, १–३० ते ५–३० विश्रांति वगैरे ५॥ ला डिनर, ६–४५ ला प्रार्थना, ७–१५ ला सेमिनार्स व ८–३० ला विविध कार्यक्रम, असा दैनिक कार्यक्रम असे. प्रारंभी आम्हाला ही कॉन्फरन्सची-भानगड नसती तर बरं झालं असतं असं वाटायचं. पण नंतर फार मौज वाटली. सर्व कार्यक्रम वेळच्या वेळी व्यवस्थित होत असत. प्रत्येक व्याख्याना नंतर प्रश्नो

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्तरे व्हायची. सर्वांत मौज संध्याकाळच्या सेमिनार्सची होती. अनेक सेमिनार होते. ज्यानं त्यानं आपल्या पसंतीप्रमाणे सेमिनार निवडायचा. मी व आमच्या पैकी आणखी तिघं, एक जपानी, सहा अमेरिकन व एक अमेरिकेचा नागरिक झालेला रशियन 'East west Relation' या सेमिनार मधे होतो. रशियन निकोलस गॉन्कॉरोफ् हा सेमिनारचा पुढारी होता. या सेमिनारमधे फार चांगली चर्चा होत असे. प्रत्येकजण आपलं मत मांडायचा व त्यावर चर्चा व्हायची. East कशाला म्हणावं व West कशाला म्हणावं इथ पासून चर्चा झाली. आमच्या सेमिनारची कीर्ति इतकी पसरली की बाकीच्या सेमिनारमधले लोक आमची चर्चा ऐकायला येऊ लागले. शेवटच्या दोन दिवशी तर बाकीचे सेमिनार बंद पडले. एकंदरीनं सेमिनारमधे आम्ही भारतीय प्रतिनिधींनी चांगलाच प्रभाव पाडला.

शुक्रवार २५ ऑगस्ट रोजी रात्री ८–३० चा वेळ खास आमच्यासाठी राखून ठेवण्यात आला होता. भारतीय शिक्षण पद्धतीवर आम्ही बोलावं असं आम्हाला सांगण्यात आलं होतं. आमच्या गटानं डॉ. कावळे व मी यांनी बोलावं अस ठरविलं. त्या प्रमाणे 'Modern Trends in Education in India' या विषयावर डॉ. कावळे व 'Some Problems Facing the Indian Teacher' या विषयावर मी बोललो व त्यानंतर प्रश्नोत्तरं झाली. आम्हाला विचारण्यात आलेल्या प्रश्नापैकी एक प्रश्न असा होता, 'अमेरिकेत येणारे भारतीय विद्यार्थी परत जायला नाखुष का असतात ? ते इथेच राहण्याचा प्रयत्न कां करतात ?' याचं योग्य ते उत्तर मी व डॉ. कावळे दोघांनीहि दिलं. 'भारतीय विद्यार्थ्यांनी इथेच राहावं हे आम्हाला पसंत नाही. थोडा कमी पगार भारतात मिळाला तरी आपल्या ज्ञानाचा फायदा आपल्या देशाला देणं त्यांचं कर्तव्य आहे. जे हे कर्तव्य करीत नाहीत त्यांना आपल्या राष्ट्राचा अभिमान नाही असं आम्ही समजतो अशा अर्थाचं उत्तर आम्ही दिलं. सर्व श्रोत्यांना ते आवडलं.

अेक समस्या

या विषया संबंधी दोन शब्द लिहणं आवश्यक आहे. कोणत्याहि परदेशीय विद्यार्थ्यानं अमेरिकेत येऊन शिक्षण घेऊन इथेच राहावं हे अमेरिकनांना बिलकुल पसंत नाही. मला किती तरी अमेरिकनांनी तसं बोलून दाखविलं. वॉशिंग्टन विद्यापीठाच्या प्राध्यापकांनी वर्गांत सुद्धा असेच उद्‌गार काढले. अमेरिकनांनाहि ही एक समस्याच होऊन बसली आहे. इथे सेंट लुईमधे पंचवीसतीस तरी भारतीय विद्यार्थी गेल्या पांचसहा वर्षांपासून नोकरी करीत आहेत. एक तर इथल्या यांत्रिकी राहणीला भाळतात, दुसरे, नोकरी लवकर मिळते व पगार चांगला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मिळतो आणि कांही थोडे एखाद्या मुलीशी भानगड करून तिच्याशी लग्न करायला भाग पडल्यामुळे इथेच अडकून पडतात. माझ्या बरोबर राहणारे दोघेजण लवकर परत जाण्याच्या विचारात नाहीत. कोणत्याहि नोकरीत महिना चार-पांचशे डॉलर्स पगार सहज मिळतो. एकाला दीडशे डॉलर्स महिन्याला पुरे होतात. महिन्याला सुमारे शंभर डॉलर्स टॅक्स भरावा लागतो. उरलेले दीड-दोनशे डॉलर्स जमा करता येतात. वर्षाकाठी अठराशे ते दोन हजार डॉलर्स जमा केले तर रुपयांत त्यांची किंमत दहा हजार रुपये होते. भारतात वर्षभरांत दहा हजार रुपये कुणीहि नोकरीपेशा माणूस शिल्लक टाकू शकणार नाही. दोघा-तिघांनी मला सांगितलं, 'दोनतीन वर्ष नोकरी करूं, पंधरावीस हजार रुपये जमा करूं आणि मग परत जाऊं' या परिस्थितीचा भारत सरकारनं गंभीरपणानं विचार करणं आवश्यक आहे.

कॉन्फरन्समधे जेवणाखाणाची व्यवस्था फार चांगली होती. प्रशस्त दालनामधे टेबल खुर्च्या मांडलेल्या होत्या. आम्ही सहाजण शाकाहारी होतो. आमच्यासाठी दोन टेबलं राखून ठेवण्यात आली होती. जेवायला सुरुवात करण्याआधी लहानशी प्रार्थना म्हणण्यात येत असे. त्यानंतर गप्पा गोष्टीत जेवण व्हायचं. जेवण संपता संपता प्रत्येक खात्याच्या व्यवस्थापका कडून कांही घोषणा व्हायच्या, कांही सूचना मिळायच्या त्या फार मजेदार व विनोदपूर्ण पद्धतीनं करण्यांत येत असत जेवायला भरपूर असे. पाण्याच्या ऐवजी मंडळी दूधच पीत असे, कितीहि ग्लास दूध प्या. केव्हांतरी भारतात पाणी मागितलं तर दूध देण्यात येत असे. आज अमेरिकेत मात्र पाण्या ऐवजी लोक दूध पितात या परिषदेत कोणत्याहि प्रकारच्या मद्याला पूर्ण मज्जाव होता. नाही तरी जेवताना कुणीहि मद्य घेत नाही. जेवणाच्या टेबलावर नेहमी पाण्याचे ग्लास असतात. पाण्या ऐवजी युरोप-अमेरिकेत जेवताना लोक मद्य पीतात असा जो समज आहे तो चुकीचा आहे. लोक जेवताना पाणी, दूध किंवा कॉफी पितात. मद्य फक्त कॉकटेल् पार्टीमधे घेतात. किंवा खास मित्र मंडळी जमली तर घेतात. खास दारुडे लोक काय करतात हे त्यांचं त्यांना ठाऊक. पण धार्मिक लोकांचे मत मद्यपानाच्या विरुद्ध आहे. आणि सोळा वर्षे वया पर्यंतच्या मुलांना मद्य पिण्यास कायद्यानंच बंदी करण्यात आली आहे.

या परिषदेत कांही अमेरिकन प्राध्यापकांच्या व आमच्या चांगल्या ओळखी झाल्या. त्यापैकी एक इंग्रजीचा प्राध्यापक जॉन अविस्मरणीय व्यक्ति आहे. रोज आमच्या टेबलावर जेवायला असायचा. मोठा मनमोकळा व दिलखुलास. मोठमोठ्यानं हसायचा व इतरांना हसवायचा. परिषद संपल्या नंतर आम्ही चार पांच जण त्याच्याच मोटारीतून शिकागोला गेलो. आम्ही आपसात

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'The first sensible American We met' असं त्याच्या विषयी म्हणत असू. शिकागोच्या इन्टरनॅशनल हाऊसमधे आम्ही त्याला आमचा पाहुणा म्हणून त्या दिवशी राहवून घेतलं. दुसरे दिवशी सकाळी तो फ्लॉरिडाला आपल्या आई कडे गेला.

आम्ही दुसऱ्यांदा शिकागोला आलो होतो. हे आमचं अधिकृत येणं होतं. पूर्वी आमचे आम्हीच एक प्रकारे विश्रांतिसाठी येऊन राहिलो होतो. यावेळी आमचं वास्तव्य एका आठवड्याहून जास्त होते. कार्यक्रमहि पुष्कळ होते. शिकागो विद्यापीठातील दोघा प्राध्यापकांशी शिक्षण विषयक प्रश्नांवर चर्चा केली, लायब्ररीत जाऊन लायब्ररीची व्यवस्था व कामकाजाची पद्धत पाहिली. अमेरिकन शिक्षण पद्धतीवर व्याख्यान ऐकलं व नंतर चर्चा केली, आणि विद्यापीठाच्या Asian Studies Department मधे जवळ जवळ एक दिवस घालविला. यापैकी प्रो. अँडर्सन व प्रो. ब्लुम या दोघांचा दोन प्रकारचा अनुभव आला. प्रो. अँडर्सनला भारता विषयी व भारतातील शिक्षण पद्धति विषयी कांहीहि माहिती नव्हती व अमेरिकन शिक्षण पद्धति फारच श्रेष्ठ दर्जाची आहे अशी अहंकाराची भावना होती. भारतीय शिक्षण पद्धति विषयी त्या गृहस्थाने फारच अनुदार उद्‌गार कारण नसतांना काढले. आम्ही कटुता उत्पन्न न होईल अशा प्रकारे त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. त्याच्याशी चर्चा आटोपल्या नंतर आम्ही नाराज होऊनच परतलो. म्हणून दुसरे दिवशी प्रो. बेंजामिन ब्लुम यांच्याशी चर्चा करायला जाण्यासाठी आम्ही उदासच होतो. पण या गृहस्थाचा अनुभव मात्र अगदी उलटा आला. भारतीय व अमेरिकन पद्धतीतील फरक त्याने व्यवस्थित रीत्या दाखविला व दोन्ही पद्धतीत काय चांगलं आहे ते सांगितले. आम्हाला साश्चर्य आनंद झाला. मग त्यानेच सांगितले की तो भारतात जाऊन आला होता व हायस्कूल शिक्षणात सुधारणा करण्याची शिफारस करणाऱ्या कमिटीवर त्याला सरकारनं नेमलं होतं. हा अनुभव आम्हाला बऱ्याच ठिकाणी आला. जे प्रत्यक्ष भारतात जाऊन आले होते त्यांचं भारता विषयी चागलं मत होतं. कारण बाकीच्यांना कांहीच माहिती नाही. अजून भारतात वाघ हत्ती व साप यांचाच सुळसुळाट आहे असं समजणारे बरेच लोक इथे आहेत. भारतात अनेक वर्तमानपत्रं आहेत हे पुष्कळांना खरंहि वाटत नाही.

शिकागो विद्यापीठाची लायब्ररी चांगलीच मोठी व समृद्ध आहे. सुमारे वीस लक्ष पुस्तके या लायब्ररीत आहेत. प्रशस्त रीडिंग रूम्स व इतर सोयी तर आहेतच. पुस्तक मिळविण्यासाठी आपल्याकडे आहे तशीच चिठ्ठी (call slip) लिहून देण्याची पद्धत आहे. ओपन अ‍ॅक्सेस् सिस्टम नाही. बहुतेक विद्यापीठाच्या ग्रंथलयातून ही पद्धत दिसत नाही. वॉशिंग्टन विद्यापीठाच्या ग्रंथालयातहि

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ही पद्धत नाही. फक्त पदव्युत्तर परीक्षेच्या विद्यार्थ्यांना स्वतः पुस्तक पाहून घेण्याची परवानगी असते. पण पुस्तकाच्या मांडणीची जी नवीन पद्धत सुरू करण्यांत आली आहे तीमुळे स्वतः पुस्तक शोधायला न जाणंच सोयीचं असतं. पूर्वीची ड्यूई पद्धत बदलून काँग्रेशनल पद्धत सुरू करण्यात आली आहे. या पद्धति मधे विषय वारीनं पुस्तकं लावण्यांत येत नाहीत आद्याक्षारानुसार ते मांडले जातात. तेव्हां एका विषयावरची दोन पुस्तकं घ्यावयाची असतील तर कितीतरी मजल्यावरून फिरावं लागतं आणि किती तरी कपाटं शोधावी लागतात. आणि वीस लक्ष पुस्तकात कोण किती शोधणार ?

शिकागो विद्यापीठाच्या एशियन स्टडीज् डिपार्टमेंटमधे मुख्यतः भारतातील भाषा व संस्कृति यांचा अभ्यास केला जातो. शिकागो विद्यापीठाच्या या भागात सध्या संस्कृत हिंदी, बंगाली, तामिळ, उर्दू, फारशी व अरबी या भाषा शिकविल्या जातात. या विभागातील एक प्रोफेसर डिमॉक हे बंगाली शिकवतात. त्यांना बंगाली बरंच चांगलं बोलता येतं. पांडेशी बंगाली बोलताता पाहून मोठी मौज वाटली. या विभागाच्या दोन प्राध्याकांशी--डिमॉक व ब्राइड-भारतीय भाषांच्या अध्यापना विषयी बरीच चर्चा केली. दुपारचं जेवण आम्ही त्यांच्या बरोबरच त्यांचे पाहुणे म्हणून केलं.

अमेरिकेतील बऱ्याच विद्यापीठातून भारतीय भाषांचा अभ्यास केला जातो. सर्वांत मोठं केंद्र फिलाडलफिया येथील पेनसिल्व्हेनिया विद्यापीठात आहे. तिथे अनेक भाषा बरोबरच लिंग्विस्टिक्सचाहि अभ्यास करण्यात येतो. पेनसिल्व्हेनिया व विस्कॉन्सिन् या दोन विद्यापीठांत मराठी शिकविली जाते.

एका दिवशी संध्याकाळी आम्ही गटागटानं निरनिराळ्या कुटुंबात जेवायला गेलो होतो. आम्ही गेलो होतो ते कुटुंब म्हणजे एक नमुनाच होता. नवरा जपानी व बायको अमेरिकन आणि मुलगी दोन्ही असं ते कनिष्ठ मध्यम वर्गीय कुटुंब होतं. नवऱ्याला इंग्रजी चांगले बोलतां येत नव्हतं म्हणून तो स्वयंपाक करीत होता व बायको आमच्याशी बोलत होती. सारा वेळ बोलण्याचं व मधून मधून हंसण्याचं काम तीच करीत होती. इतरांना बोलायला येतं हे ती विसरलीच होती. आम्हीहि तिचा तो नमुना पाहून तिच्या बोलण्या-हसण्याचीच करमणूक करून घ्यायला लागलो. त्यांची मुलगी सतरा-अठरा वर्षांची होती व एक नमुनाच होती. हे खायची नाही, ते प्यायची नाही, नाराज व्हायची, बोलायला लागली की थांबायची नाही, असे अनेक प्रकार तिचे होते. बिचारा घर मालक काय थोडं बोलला तेहि आम्हांला कळलं नाही. एकूण कुटुंबच नमुनेदार होतं. कुटुंबाचा आवडता छंद म्हणजे परदेशीय पाहुण्यांना जेवायला बोलावणं. आपल्याकडे कोणकोणत्या देशाचे किती किती पाहुणे येऊन गेले हे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्या बाईनं मोठ्या अभिमानानं सांगितलं आणि त्यांची नांवे व पत्ते दाखविले. त्यांत आमच्या चार–पांच नांवांची भर पडली.

१ सप्टेंबर हा आमच्या पूर्व नियोजित कार्यक्रमाचा शेवटचा होता. त्या दिवशी तीन स्त्रिया मोटारी घेऊन आल्या व आम्ही त्यांच्या बरोबर शहर पाहायला गेलों. नेहमी प्रमाणे आमच्या वाट्याला वृद्ध मालकिणीचीच मोटार आली. त्या बाईचे वय काय होतं हें नक्की सांगतां येत नाही, पण साठाच्या वर होतं हे खरे. तिला दोन वाक्यं बोलली की दम लागत असे, आणि ती बाई सतत पांच तास ताशी चाळीस मैल वेगानं मोटार चालवीत होती. शहर व्यवस्थित रीत्या दाखविणं तिला जमलं नाही, पण तिचा उत्साह पाहून मात्र आम्ही थक्क झालो. दुपारचे जेवण सुद्धा तिनंच आम्हांला एका हॉटेलांत दिलं. आम्ही नंतर बराच विचार केला की ह्या स्त्रिया कामधाम सोडून वेळ व पैसा खर्च करून आम्हांला शहर दाखविण्यासाठी कां आल्या ? कां येतात ? परकीयांना जास्त आत्मीयतेनं वागवून अमेरिके विषयी चांगलं जागतिक लोकमत तयार करावं असा तर एक हेतु आहेच. पण त्याला घरगुती कारणहि आहे. या स्त्रिया दिवसभर अगदी मोकळ्या असतात, पुरुष सकाळीं ९ वा. कामाला गेले की संध्याकाळी पांच सहा वाजता परत येतात. मुलं स्वतंत्र होऊन वेगळ्या घरी राहतात. घरात काम कांही नसते. पंधरा मिनिटात ब्रेकफास्ट व अर्ध्यातासात जेवण, धुणं झाडझूड सर्व कांही यंत्रानं होतं. मग या स्त्रियांना विरंगुळा काय ? त्यांचा वेळ कसा जावा ? सारखं गुंतुन पडायला पाहिजे. अमेरिकन माणूस स्वस्थ व शांत बसूं शकत नाही. पूर्वोक्त प्रो. अँडर्सननंच म्हटलं होतं. 'The American always Keeps himslf busy, sometimes in nonsensical activities'. त्यांना एक्साइटमेंट पाहिजे. थ्रिल पाहिजे. आणि परदेशीय पाहुण्यांना जेवायला बोलावणं, त्यांना शहर दाखवणं हेहि एक प्रकारचे एक्साइटमेंटच आहे.

दुसऱ्या क्रमांकाचं शहर

शिकागो हे अमेरिकेतलं दुसऱ्या क्रमांकाचं शहर आहे न्यूयॉर्क नंतर शिकागोचाच नंबर आहे. उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, सर्वच बाबतीत शिकागोचा दुसरा नंबर आहे. वस्ती सुमारे ३६ लक्ष आहे (न्यूयॉर्कची वस्ती सुमारे ७८ लक्ष आहे) मोठ मोठे कारखाने विशेषत: पोलादाचे कारखाने शिकागोत आहेत. शिकागो विद्यापीठ व नॉर्थ वेस्टर्न विद्यापीठ अशी दोन विद्यापीठं या शहरात आहेत. दोन्ही चांगली प्रसिद्ध आहेत. त्यात शिकागो विद्यापीठाचा अमेरिकेतील पहिल्या रांगेतल्या विद्यापीठात समावेश होतो. शिकागोचं सायन्स

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्यूझिएमहि फार प्रसिद्ध आहे. विज्ञानानं काय काय केलं आहे हे दाखविणारी अनेक दालनं आहेत. शिकागोतील सर्वांत उंच इमारत पंचावन मजली आहे अनेक सुपरमार्केट्स व डिपार्टमेंटल स्टोअर्स आहेत.

शिकागोत भारतीयांची बरीच वस्ती आहे. सुमारे आठशे भारतीय मध्या तिथे असतात. त्यात बरेच महाराष्ट्रीय आहेत. सुमारे बेचाळीस वर्षांपूर्वी अमेरिकेला आलेले व आता अमेरिकेचे नागरिक झालेले मूळचे पुण्याचे श्री. भाटवडेकर आम्हांला तिथे भेटले. त्यांच्या वरी आम्ही सर्व परिचित मराठी भावगीतं ऐकली. ते परिचित आवाज व शब्द कानी पडताच केवढा आनंद झाला ! भाटवडेकरांनी अनेक भावगीतं व शास्त्रीय चिजा टेपवर उतरवून घतल्या आहेत. बेचाळीस वर्षं अमेरिकेत राहूनहि भारतीय संगीत व मराठी भावगीतं यांची त्यांना असलेली आवड कमी झाली नाही. मराठीहि ते चांगलंच बोलतात. शिकागोला एक विवेकानंद मंदिरहि आहे. आम्ही गेलो तेव्हां स्वामीजी बाहेर गांवी गेले होते म्हणून भेट झाली नाही. दोन अमेरिकन कसल्या तरी रेकॉर्ड्स् लावून बसले होते. त्यांनी आम्हांला मंदिर दाखवलं. उन्हाळयाच्या सुटी नंतर व्याख्यानं सुरूं होतील असं सांगितलं. व्याख्यानांना अमेरिकन श्रोत्यांची चांगलीच गर्दी होत असते म्हणतात. शिकागोला बाहाई पंथीयांचंहि एक देऊळ आहे. कुणा बहाउल्लानं सर्व धर्मांचा समन्वय करणारा पंथ स्थापन केला आहे. अमेरिकेत या पंथाचे बरेच लोक आहेत मंदिरात कृष्ण, बुद्ध, येशु व महंम्मद यांच्या जन्माची वर्षं भिंतीवर कोरली आहेत. कृष्ण जन्माचं वर्ष तीन हजार असं कोरून पुढे कंसांत 'नक्की माहीत नाही' असं लिहिलं आहे. मी तिथल्या बाईला हें पांच हजार वर्षं असलं पाहिजे म्हणून सांगितलं. 'असावं. आम्हांला कांही माहीत नाही' असं ती म्हणाली. मी तिला लेखी सूचना केली आहे. 'थ्यँक्यू' म्हणून तिनं ती घेतली. पुढे त्या सूचनेचा काय उपयोग होणार हे ठरल्या सारखंच आहे.

आणि पहिल्या क्रमांकाचंहि

शिकागो शहर एक प्रकारे मला आवडलं 'एक प्रकारे' म्हणायचं कारण असं की शिकागोत राहू नये असं वाटायला लावणाऱ्या पुष्कळ गोष्टी तिथे आहेत. प्रथम जेव्हां आम्ही शिकागोला गेलो तेव्हां एका अनोळखी अमेरिकनानं आम्ही इंटर-नॅशनल हाऊस मधून बाहेर पडत असताना हळूं आवाजात सांगितलं 'लवकर परत या. सातच्या नंतर बाहेर हिंडू नका' पुढे अनेकांनी निरनिराळ्या वेळी असाच उपदेश केला. शिकागो शहर गुंडागिरीसाठी प्रसिद्ध आहे. सबंध अमेरिकेत याचा पहिला नंबर लागतो. संध्याकाळी सात नंतर बाहेर फिरणं धोक्याचं वाटावं अशी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खरोखरच परिस्थिति आहे. केव्हां एखादा गुंड मागून येईल व डोक्यावर प्रहार करून लुवाडील याचा नेम नाही. शिकागोत 'अंडर ग्राऊंड वर्ल्ड' म्हणून दुसरंच जग आहे. शहरात रोज किती खून, दरोडे, बलात्कार होतात याची गणती नाही. दुसऱ्या एखाद्या शहरात अकल्पित पद्धतीनं गुन्हा घडला तर 'शिकागो मेथड'नं करण्यात आला असं म्हणतात. सरकार या गुंडागिरीला आळा घालण्याला असमर्थ आहे. प्रतिष्ठित गृहस्थ या 'गुंडागिरीचे सूत्रधार आहेत व त्यांना शोधून काढणं कठीण आहे म्हणतात. प्रत्येक अमेरिकन मान खाली करून हळू आवाजात म्हणतो. 'It is a social problem'. आश्चर्यच आहे.

वेगवेडे अमेरिकन

१ सप्टेंबर रोजी आमचं शिकागोतलं अधिकृत वास्तव्य संपलं. पण पुढे कांही दिवस आम्ही तिथं राहिलो. एक तर विद्यापीठं अजून सुरू व्हावयाची होती व लेबर हॉली डे आणि शनिवार-रविवार मिळून चार सुटचा आल्या होत्या त्यामुळे अमेरिकनांची पिक्‌निक् व इतर कारणांसाठी प्रवासाची गर्दी सुरू झाली होती. अशा वेळी बसेस् व आगगाडचा भरून जातात, जागा मिळत नाही, आणि सडकेला अपघातहि फार होतात. म्हणून आम्हांला चार दिवस तिथेंच राहण्याचा सल्ला डॅन्फोर्थ फाउंडेशनच्या संचालकांनी दिला होता. अमेरिकेत घरा बाहेर पडायचं हे एक वेडच (खुद्द अमेरिकन लोकहि याला Craziness म्हणतात) आहे. कसलीहि सुटी आली की लाखो मोटारी सडकेवरून ताशी सत्तर ते नव्वद मैल वेगानं धावायला लागतात. अपघात न झाले तरच नवल. अशा सुटचा जवळ आल्या की सरकारी अधिकारी संभाव्य अपघाताचे आकडे प्रसिद्ध करायला लागतात. नागरिकांना हळू आणि जागृतपणानं मोटारी चालविण्याची सूचना करण्यात येते. खुद्द अमेरिकेचा अध्यक्ष देखील जाहीर रीतीनं 'गो स्लो' ची विनंति करतो. पण कशाचाहि उपयोग होत नाही. आता येत्या ख्रिस्‌मसमधे अपघात कमी करण्यासाठी पोलीस खातं एक नवीन योजना आखीत आहे. दर तीन चार तासांनी मोटार हाक्यांना थांबवून चहा-कॉफी-कोकाकोला पाजून त्यांना ताजं तवानं करून व शुद्धीवर आणून पुढे सोडणार आहेत. पोलीस खातं यासाठी खर्च करणार आहे. परिणाम उलट झाला तरहि नवल नाही. ताजं तवानं होऊन दुप्पट वेगानं गाडी हाकायला हे अमेरिकन कमी करणार नाहीत.

स्वल्प विराम

२ सप्टेंबर पासूनच आमच्यापैकी एकेकजण आपल्या विद्यापीठाच्या शहरी जायला लागला. दोन महिने एकत्र राहून प्रवास केल्यामुळे आमच्यात एक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रकारचा घरोबा निर्माण झाला होता. भारतात आम्ही पूर्वी कधीहि एकमेकांना भेटलो नव्हतो. पण आता आमचं एक कुटुंब निर्माण झालं होतं. आमच्यापैकी कांहीजण पूर्व किनाऱ्याला, कांहीजण पश्चिम किनाऱ्याला जाणार होते. एक जण शिकागोलाच राहणार होता व मी सेंट लुईला जाणार होतो. फाटाफूट होताना सर्वांनाच अवघड वाटलं. एकेकजण जड अंतःकरणानं बाकीच्यांचा निरोप घेऊन जाऊं लागला. राहिलेल्यांना उदासवाणं वाटायला लागलं. सर्वांत शेवटी मी ७ सप्टेंबरला शिकागो सोडलं. मला निरोप द्यायला तिथेंच राहणारा कृष्ण स्वामी हाच काय तो आमच्या गटापैकी उरला होता. दोघांनीहि जड अंतःकरणानं एकमेकाचा निरोप घेतला. दुपारी १२ वाजतां ग्रे हाउंड बसनं शिकागोहून निघून सेंट लुईला संध्याकाळीं ६ वाजतां पोंचलो. बस स्टेशनवर वॉशिंग्टन विद्यापीठा तर्फे मि. व मिसेस् मून मला घ्यायला आले होते. त्यांनी आपल्या मोटारीतून मला विद्यापीठाच्या अपार्टमेंटमधे आणून सोडलं. ८ जुलैला नागपूर सोडल्या नंतर बरोबर दोन महिन्यांनी मी मुक्कामाला पोचलो.

सेंट लुईला नवे मित्र मिळाले. कांही अमेरिकन कुटुंबांचाहि परिचय झाला. विद्यापीठात वर्ग सुरू होऊन अभ्यास सुरू झाला आणि एक प्रकारच्या चाकोरीत मी रूळायला लागलो. तरी आपला देश, आपलं शहर व आपली माणसं यांची आठवण येऊन मनाची चलबिचल होते. प्रवासातल्या मित्रांची आठवण येते. मनाला अभ्यासात गुंतवून सर्व विसरावं लागतं. आणखी एक वर्ष तरी इथे राहायचं असल्यामुळे प्रवास तात्पुरता संपला असं मानायला पाहिजे. आणि म्हणून हे प्रवास वर्णनहि इथेच थांबवायला पाहिजे.

समाप्त.

रे. टिळक (पृ. १८ वरून)

ती वाढत गेली. तेव्हां त्यांना मुंबईला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. परंतु सारे उपचार थकले. आणि ते तेथेच शुक्रवार दि. ९ मे १९१९ ला सायंकाळी सव्वा पांच वाजतां ख्रिस्तदेवात विलीन झाले. टिळकांनी मृत्यु शय्येवर असतांना कांही अभंग गाइले आहेत. त्यात त्यांची भाविकतेतून जन्म पावलेली धीरोदात्त व आशावादी वृत्ति दृष्टीस पडते;—

निजीव मजला तुझ्या अंकावर । अंगावर कर ठेव माझ्या ॥
तुझ्या मुखाकडे दृष्टी लागलेली । राहो खिळलेली मायबापा !॥
असाच मजला दयाळा ! आनंदे । जीव हा सोडूं दे अंती आता ॥
दास म्हणे माझा छंद शेवटला । पुरीव वत्सल ! येवढा हा ॥

(अपूर्ण.)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कुणी बुडवाव्या माझ्या-

कुणी बुडवाव्या माझ्या
इंद्रायणीत कविता
अन् तुक्याच्या विठूने
माझा उंचवावा माथा

नांदुरकीच्या छायेत
मुक्ती सोहळा चालावा
माझ्या जीवनाचा अंत
वर वैकुंठात व्हावा

—कुसुमानंद

मृगजळ

लोचनात माझ्या
साकारले स्वप्न
पापण्यांचे रान
वेडावले

स्मृतीचा विळखा
चांदण्याची रात
गुलाबाची प्रीत
नित्य असे

मौनाची साखळी
जाणीवेत चिरे
अतृप्तीचे झरे
वासकरी

सोनियाच्या ओठी
विषाचे देऊळ
हाती मृगजळ
आले आता

—म. ना. श्रीखंडे, वरूड

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आठवण—

हलका फुलका वारा
थरथरते डहाळी
पानापानांच्या मनात
गोड स्वप्नाची शहाळी
दूर टेकड्यांची रांग
स्वप्नकथेतल्या पऱ्या
शांत संथ पाण्यावर
नावा डोलतात भुऱ्या
डवरला माळमाया
शीतपणाच्या कळ्यांनी
गात बसल्या सावल्या
खुळ्या मातीची कहाणी
रंग मेंदीचा रुतला
खडकाच्या पापणीत
आभाळाची कानगोष्ट
चांद राहिला ऐकत
इथे तिथे सारे शांत
झोप सुटे चांदण्याला
आठवेना खिडकीस
कुठे घुंगरू तुटला ?

—राजा महाजन

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परिचय–परामर्श

तुकाराम महाराजांची गुरु परंपरा

लेे०–वा. सी. बेंद्रे, प्रकाशक:–वा. पु. भागवत, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी. मुंबई ४. मूल्य आठ रुपये.

श्री, वा. सी. बेंद्रे हे प्रसिद्ध इतिहास संशोधक आहेत. त्यांनी आपली हयात याच कार्यात व्यतीत केली असे नि:संशय म्हणता येईल. मराठा कालीन इतिहासाची जुळणी करता करता आता ते कांहीशा वेगळ्या क्षेत्रात शिरले आहेत. इतिहासाचे सूत्र धरून, श्री तुकाराम महाराजांच्या गुरु परंपरेच्या संशोधनात शिरून, त्यानी जे शोध लावले आहेत ते या पुस्तकात त्यांनी ग्रथित केले आहेत. त्यांनी केलेला व्यासंग व घेतलेले परिश्रम याबद्दल त्यांचे कौतुक करणे अभ्यासकांचे कर्तव्यच आहे.

‘इतिहास’ व ‘पराधर्म’ यांच्या प्रकृति भिन्न

श्री. बेंद्रे यांनी संशोधनास घेतलेला विषय शुद्ध ऐतिहासिक नाही, हे लक्षात घेणे अवश्य आहे. त्यांच्याच आवडत्या शब्दात सांगावयाचे म्हणजे असे की ‘पराधर्मा’च्या एका भागाचे ते संशोधन करीत आहेत; आणि पराधर्म व इतिहास यांच्या प्रकृती कांही ठळक बाबतीत तरी इतक्या परस्पर विलक्षण व परस्पर विरोधी आहेत, की त्यांचे त्यात सख्य संभवणे कठीण.

श्री. बेन्द्रे यांचे मुख्य प्रमेय

श्री. बेन्द्रे यांनी आपल्या ‘मंत्रगीते’च्या प्रास्ताविकात जे वैचारिक हृगद्त प्रकट केले आहे, तेच प्रस्तुत ग्रंथाच्या रूपाने अधिक फुलले आहे. श्री. बेंद्रे यांचे मुख्य प्रमेय हे आहे की श्री तुकाराम पराधर्मांत फार मोठी आमूलाग्र क्रांति करणारे होऊन गेले, त्यांनी परामार्गातील नवीन व प्रगत असे युग निर्माण केले, त्यांनी तत्पूर्वी रूढ झालेल्या व सर्व समाजास अधोगतीस नेणाऱ्या धर्म–जाति–वर्ण–वेष इ. वेड्यांच्या बंधनाविरुद्ध बंड पुकारले; आणि ही सर्व परिणति चैतन्य संप्रदायाने पेरलेल्या समर्थ बीजाच्या जिवंतपणातून झाली आहे. त्यांचे एकच वाक्य उद्धृत करितो. ते म्हणतात, ‘इतकेच नव्हे तर नूतन प्रगतिपर सुलभ व श्रेष्ठ तत्वज्ञानाला जोराचा अंकुर फुटला आणि

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नंतरच्या एका शतकात सर्वांस व सर्रास उपयुक्त अशी उच्च पारमार्थिक साधनांची निष्पत्ति तुकोवांच्या वाणीतून अखिल जनतेच्या परिचयाची झाली. म्हणून या नूतन 'परम'ज्ञान प्रणालीचे आद्यस्थान तुकोवांनी आपल्या मरमेष्ठी गुरु राघव चैतन्यांना दिले आहे.' (पृ. ९०) श्री. वेंद्रे यांचे प्रस्तुत पुस्तक विशिष्ट हेतूने लिहिले गेले आहे, हे त्यातील वेळोवेळीच्या अभिप्रायावरून 'उपसंहारा'वरून दिसते, अगदी स्पष्ट दिसते. त्यामुळे असे नि:संकोच म्हणावे लागते, की त्यांच्या संशोधकी बाण्यास इथे वट्टा लागला आहे !

आपले आवडते प्रमेय सिद्ध करण्याकरिता श्री. वेंद्रे यांनी अट्टाहासपूर्वक दाखविण्याचा प्रयत्न केला आहे की श्री. तुकारामांचे आजेगुरु व पणजेगुरु महानुभावीय होते. तसे दाखविताना त्यांच्या ऐतिहासिक वुद्धीच्या कोल्हाटिणीने जी कांही कसरत केली आहे ती पाहण्यासारखी आहे. किंवहुना असेहि म्हणता येईल की त्यांच्या प्रस्तुत ग्रंथातील सर्वांत अधिक आक्षेपार्ह भाग तोच आहे. म्हणून या समीक्षणात त्याचाच अधिक परामर्श घ्यावयाचे मी ठरविले आहे.

कृष्णदासाची 'चैतन्यलीला'

श्री तुकारामांच्या गुरुपरंपरेची सांखळी जुळविण्यात कृष्णदासाचा 'चैतन्य-लीला' हा ग्रंथ सर्वाधिक महत्वाचा कसा आहे, हे श्री. वेन्द्रे यांनी चांगले दाखविले आहे. त्यांनी या ग्रंथावावत असे स्पष्ट मत दिले आहे, की त्यात सुसंगति दिसून येते व अठरा अध्याया पर्यंतची हकिकत, 'कांहीशी' का होईना, साधार दिसून येते. कृष्णदास हा चैतन्यसंप्रदायी होता एवढेच नव्हे, तर त्याला परंपरेचे चांगले ज्ञान असून तो 'पराधर्मात चांगलीच प्रगति' (पृ. १०) झालेला होता; केशव चैतन्यांच्या मठाचा तो कारभारीहि होता. ही श्री. वेंन्द्रचांची कवूली लक्षात घेऊन त्यांच्या प्रमेयाची सिद्धि करणारे मोठे प्रमाण म्हणजे चैतन्य संप्रदायाचे महानुभावीयत्व याची आता शहानिशा करू.

केशव चैतन्यांचे चिरंजीव नरसिंह भट यांनी दर्शन देऊन गुरुकुळीचा इतिहास लिहिण्याची आज्ञा दिली, असे ग्रंथकर्ता स्पष्ट सांगतो. श्री. वेंद्रे यातील इतिहास–संशोधकाने या घटनेचा अर्थ, नरसिंहाच्या कुळकटीच्या टांचणावरून कृष्णदासाने राजर्षि घराण्याचा इतिहास रचला, असा केला आहे. 'पराधर्मा'-तील सिद्धांतावर हा पहिला आघात आहे. तो वाजूस ठेवून आपण श्री. वेंद्रे यांच्याच क्रमाने त्यांच्या महानुभावीयत्वाच्या कल्पनेचे परीक्षण करू. प्रथम राघव चैतन्यांवद्दल त्यांनी जे इतिहास–संशोधन केले आहे ते पाहू. चैतन्य संप्रदायांच्या परंपरेत मुरलेल्या कृष्णदासाने, अप्रत्यक्षपणे देखील, असे दाखविले नाही की राघव चैतन्यांचा महानुभावीय आचारधर्माशी, काडी इतका कां होईना, संबंध होता. त्याचे सर्व लिखाण वैदिक धर्माच्या थाटाचेच आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वतः कृष्णदास 'स्मार्त' हि होता. आता श्री. वेंद्रे यांना या चरित्रकाराला महानुभावीय ठरविण्यास एका काडीचा आधार मात्र मिळू शकतो. 'कृष्णभट' हा 'कृष्णदास' झाला व महानुभावीयात पुष्कळसे 'कृष्णदास' होऊन गेले या एकाच गोष्टीवरून ते अशी संशोधकी उडी घेऊ शकतात ! राघवचैतन्य महानुभावीय असण्याची शंका, व्यासांनी केलेल्या उपदेशाच्या घटनेवरून त्यांना आली, असे या ग्रंथावरून दिसते. 'हा व्यास कोण' असा त्यांना विचार पडला व ते महानुभाव पंथाकडे आसऱ्यास धावले. श्री. वेन्द्रे यांच्या या ग्रंथाचा विशेष हा आहे, की त्यांना आपल्या प्रतिपादनाची अधून मधून भूल पडते व त्यामुळे त्यांचा अवसानघात होऊन त्यांची डळमळीत भूमिका उघडकीस येते. व्यासाच्या बाबतीतहि असेच झाले आहे. व्यास कोण असावा या विचारा वरून ते महानुभाव पंथाकडे वळले, पण त्यांनीच ग्रंथात एक दोन ठिकाणी असे म्हटले आहे, की व्यास हा ईश्वर होय व म्हणून गुरुपरंपरेत त्याचे नांव आले नाही. महानुभावी वाङ्मयात व्यासांची रेलचेल खूप आहे. ती पाहून श्री. वेन्द्रे यांना वाटले, की राघव चैतन्यांना मनःशांती करिता चतुःश्लोकी भागवताचा उपदेश करणारा व्यास महानुभावीय तर नाही ?

श्री. बेंन्द्रे यांचे दोन आधार

आपल्या कल्पनेच्या समर्थनार्थ त्यांनी 'महाराष्ट्र सारस्वत' कारांचा आधार घेतला आहे. 'महाराष्ट्र सारस्वताच्या दुसऱ्या आवृत्तीत दिलेला व पुढील आवृत्तीत गाळलेला एक महानुभावीय उतारा व वाई येथील यादीनामा हे त्यांना या दृष्टीने मोठे भरवंशाचे वाटतात. एक तर तो उतारा कुठला आहे याचा पत्ता नाही आणि दुसरे असे, की त्यातून श्री—वेन्द्रयांना वाटतो तो अर्थ ध्वनित होत नाही. वाईच्या यादीनाम्याचेहि असेच आहे. महानुभावीय उताऱ्यात महंमद सुलतानासी संवाद करणाऱ्या चौघाची स्पष्ट विशेषणे आहेत. राघव चैतन्य सन्यासी, दधी जोशी ज्योतिषी, गोपाळ पंडित व विठ्ठलराव असे चौघेजण सुलतानाशी धर्मचर्चा करीत असता ते म्हणाले 'सापे नागदेव भट्ट नावे मार्ग एकू उदेला असे:' त्यावर सुलतान कांही बोलला व त्याने ती गोष्ट टाळली असे दिसते. या महानुभावीय वाक्यावरून श्री. वेन्द्रयाना महानुभावीय व्यासाचा वास आला. वस्तुतः या वाक्याचा अर्थ राघव चैतन्यांनी 'नागदेव भट्टाच्या नूतन धर्माची तरफदारी केली' (पृ. ७१) असा कसा होतो हेच समजत नाही. महानुभाव पंथास व्यवस्थित रूप देऊन शके १२२४ मध्ये मृत्यु पावलेल्या नागदेवाचार्याच्या मार्गास सुमारे दोनशे वर्षांनंतर झालेले राघव चैतन्य नवीन मार्ग म्हणतील असे वाटत नाही. पुनः 'एकू' या शब्दावरूनच तिऱ्हाईतपणा दिसतो, तरफदारी दिसत नाही. वाईच्या यादीनाम्यात राघव चैतन्याचे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महानुभावीयत्व न दिसता वैदिकत्वच स्पष्ट दिसते. राघव चैतन्यानी सुलतानाचा राजफोड बरा केल्याची जी घटना यात दिली आहे, ती त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या श्रीनरसिंह–सरस्वतीच्या चरित्रात येणाऱ्या घटनेसारखीच आहे. संतांच्या चरित्र लेखनांत आपल्यास पुष्कळदा असे दिसते, की चमत्कारांची अदलाबदल व पुनरावृत्ति झालेली आहे. राघव चैतन्यांनी राजफोड बरा केला असेल यात शंका बाळगण्याचे कारण नाही. पण एकूण घटनेचे वर्णन जे केले गेले आहे ते निःसंदिग्धपणे असे दाखविते, की श्री. वेन्द्रचांच्या तर्कास मुळीच वाव नाही; इतकेच नव्हे, तर सरळसरळ विरोध करणारे ते आहे. वैद्यांनी ब्राह्मणाच्या रक्तानेच म्हणजे ते लावण्यानेच फोड दुरुस्त होईल असे सांगितल्यामुळे सुलतानाने 'तमाम ब्राह्मण गोळा केले. 'त्यामधे एक सत्पुरुष राघो चैतन्य होता' या वाक्यावरूनच हे स्पष्ट आहे, की राघो चैतन्य ब्राह्मण संन्यासी म्हणूनच आणले गेले होते. त्यांनी 'ब्राह्मण कशास गोळा केले' हे विचारल्यावर त्याचे कारण सांगण्यात आले. त्यावर त्यांनी म्हटले, की 'राजफोड बरा केलिया मग तो ब्राह्मणास काही आजार नाही का म्हणून पुसीले;' आणि मग त्यांनी तो फोड बरा केला यादीनामा पुढे वर्णन करितो, की 'त्यावरून राजा बहुत संतुष्ट होऊन बोलिला की हे ब्राह्मण जे मागतील ते त्यास देणे म्हणून हुकुम केला. त्यावरी ब्राह्मणास व राघो चैतन्यासी पुसता बोलिले जे आपणास तुरकाचे काही प्रतिग्रह न लगे आम्हास भिक्षेस पृथ्वी पडली आहे.' ही तेजस्विता, निर्भयता व निस्पृहता महानुभावीय इतिहासात कशी दिसत नाही हे मी पुढे थोडक्यात दाखविणारच आहे. या घटनेत राघव चैतन्यांचा मूळ पीळ म्हणजे यवनसेवा न करता यवननिर्दालन करणे हा परिपूर्ण दिसतो. हा यादीनामा सतराव्या शतकाचा आहे हेहि लक्षात ठेविले पाहिजे.

एक अभिनव उपपत्ति

श्री. वेन्द्रे लिहितात, "उलट वाईच्या यादीनाम्यातील इ. स. १५१० च्या सुमाराच्या प्रसंगात त्यांची ब्राह्मणात गणना न करता त्यांस 'एक सत्पुरुष' म्हणून लिहिले आहे. कदाचित् वर्णाश्रम धर्माप्रमाणे त्यास सशास्त्र दीक्षा न झाल्याने महानुभावीय व इतर संन्यस्तांना 'सत्पुरुष' म्हणण्याचा पाठ जो रूढ झाला आहे त्यास अनुसरून असा उल्लेख होणे शक्य आहे." (पृ. ६४) इतिहास–संशोधकाच्या निरंकुशत्वाचा हा एक नमुना आहे! 'सत्पुरुष' या शब्दाची निर्मिति त्याकाळी कोणत्या हेतूस्तव झाली होती याबाबतची श्री. वेन्द्रे यांची उपपत्ति अभिनव आहे. त्यांच्या दुर्दैवाने सतराव्या शतकात लिहिल्या गेलेल्या या यादीनाम्याच्या बऱ्याच पूर्वी लिहिल्या गेलेल्या श्रीगुरुचरित्रातील राजस्फोटक बरा करणाऱ्या घटनेत विधियुक्त वैदिक संन्यासी या अर्थी सत्पुरुष

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हाच शब्द आला आहे. (अध्याय ५० वा) एवढेच नव्हे तर तिथे 'महानुभाव दर्शन' हा शब्दहि दोनदा आला आहे. कोणताहि संशोधक श्रीगुरु चरित्र, या चरित्राचे नायक श्रीनरसिंह सरस्वती व लेखक सरस्वती गंगाधर यांना वैदिकेतर म्हणण्यास धजणार नाही. तत्कालीन मराठी वाङमयात 'सत्पुरुष' या शब्दाच्या उपयोगास अशा मर्यादा असल्याच्या मुळीच दिसत नाहीत.

श्री. बेन्द्रे यांचा आणखी असा तर्क आहे, की राघव चैतन्य क्षत्रिय होते व त्यामुळे 'श्रेष्ठ दर्जाच्या योगानुष्ठानास पात्र होण्यासाठी गोसावी अथवा महानुभाव पंथच काय ते त्यांना मोकळे होते.' (पृ. ६४) ते पुढे असेहि लिहितात, की "इतकेच नव्हे तर 'चैतन्यलीले'त वर्णन केलेली त्यांची घोर उपासना महानुभावीय पंथातील आचार–धर्माशीच अधिक जुळती आहे. महानुभावीय पंथातील संन्यस्तांचा सामान्य आचार म्हणजे तीर्थाटण, भिक्षाभोजन, एकांतवास व परमेश्वराचे नामस्मरण.. श्रीदत्तात्रयाच्या अगर इतर चारांपैकी कोणत्याहि ईश्वरावताराच्या चरणस्पर्शाने पवित्र झालेल्या 'संबंधी' पाषाणाची किंवा मूर्तीची स्थापना करणे, तिचीच त्रिकाळ पूजा; इतर व्रते वर्ज्य." (पृ. ६४) आता श्री. बेन्द्रे यांच्या या वाक्यातील गडबडगुंडा पहा !

एक तर राघव चैतन्य क्षत्रिय ठरत नाहीत हे मी पुढे दाखविणारच आहे. दुसरे असे, की क्षत्रियास श्रेष्ठ कनिष्ठ कोणतेहि योगानुष्ठान कधीच निषिद्ध नव्हते. त्यामुळे गोसावी पंथ वा महानुभाव पंथ मोकळा असण्याचा प्रश्नच उरत नाही. तिसरे असे, की एकदा योगानुष्ठान व एकदा घोर उपासना असे म्हणत असल्यामुळे लेखकाला या विषयाची कल्पनाच नसावी असे दिसते. चौथे असे, की महानुभावीय आचार धर्मात योगानुष्ठानास, त्यानेहि लिहिल्याप्रमाणे वाव नाही. पांचवे असे की महानुभावीय संन्यस्तांचा सामान्य आचार वैदिक धर्मीयांहून वेगळा कसा आहे हे लेखकाने बिलकूल दाखविले नाही. तीर्थाटण, भिक्षा भोजन, एकांत वास व परमेश्वराचे नामस्मरण यात खास असे महानुभावीयत्व काय आहे ? इतर कित्येक गोष्टी प्रमाणेच याहि गोष्टी महानुभाव पंथाने वैदिक धर्मापासूनच घेतल्या आहेत. पुन: कोणत्याहि तीव्रवेग साधकाच्या साधनावस्थेत आढळणारा घोरपणा राघव चैतन्यांच्या बाबतीत दिसतो. त्यामुळे त्यांच्या साधनेशी महानुभाव पंथाचा संबंध जोडणे हास्यास्पदच नव्हे काय ? 'इतर व्रते वर्ज्य' हे श्री. बेंद्र्यांचेच म्हणणे राघव चैतन्यांना महानुभावीय निश्चितच ठरवीत नाही. राघव चैतन्य, एकनिष्ठ शिवोपासक होते हे श्री. बेंद्र्यांनी वारंवार चांगलेच दाखविले आहे. गौरांग प्रभूचा या चैतन्य संप्रदायाशी कांहीच संबंध नाही हे दाखविण्याकरिता श्री. बेंद्र्यांनी जी चर्चा केली आहे, ती सर्वची सर्व त्यांच्या या तर्कास मूठमाती देणारी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे हे त्यांच्या लक्षात आले नाही राघव चैतन्यांनी सोमेश्वराच्याच देवळात वास्तव्य केले होते वगैरे गोष्टी त्यांच्या संबंधीच्या महानुभावीय आचार विषयक तर्कटाच्या विरुद्ध जातात हे ते विसरले. महानुभावीय तत्त्वज्ञानाप्रमाणे शिव हा परमेश्वर नव्हे, ती देवता आहे. त्यात देवतांचे उच्चनीच असे ९ थोवे आहेत. हर ही देवता पांचव्या थोव्यात आहे. उमापति, पशुपति, सदाशिव व महादेव या देवता अष्टभैरव नांवाच्या सातव्या थोव्यात आहेत. शिव याला कोठेंच स्थान नाही. या अष्टभैरवांच्यावर आठवा थोवा विश्वदेवतेचा आहे. म्हणजे शिव हे पर्यायनाम म्हणून धरले तरी ती देवता महानुभावीय तत्त्वज्ञानाप्रमाणे खालची आहे. राघव चैतन्यांना व्यासाने 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र दिला. वासुदेव ही वेगळी देवता महानुभावीयात नाही. माधव ही देवता अंतराळीच्या गंधर्व देवतात (हा तिसरा थोवा आहे) आहे. क्षीराब्धीचा शेषशय्या हा सहावा थोवा आहे. यातील नारायण ही मुख्य देवता. सातव्या थोव्यात विष्णु ही देवता आहे. सांगण्याचा मुद्दा असा, की वासुदेव देवता वेगळी मानली तरी ती खालच्याच दर्जाची. महानुभावी तत्त्वज्ञान सर्व देवतांना नित्यवद्ध, त्रुटित व विपरीत ज्ञानाच्या, क्षुद्र आनंद देणाऱ्या, मर्यादित सामर्थ्याच्या, अधीनत्ववंध, अज्ञानबंध, त्रिगुणात्मक अविद्यावंध असलेल्या, सापेक्षा, वंचक, उदासी, वैरिणी, निष्ठुर इ. गुणधर्माच्या मानते. राघव चैतन्यच काय, पण चैतन्यत्रयी आमरण शिवोपासक होती हे श्री. वेंद्रे यांना मान्य असलेले मत स्पष्ट दाखविते, की एक तर ही त्रयी महानुभावीय आचार धर्माची नव्हतीच; आणि असलीच तर त्यांची उपासना नीच प्रतीची होती. कारण महानुभावमते शिव ही देवता अवरच.

इतरहि कित्येक आचारधर्मीय बावी असे स्पष्ट दर्शवितात, की राघव चैतन्यांचा आचार वैदिकधर्मीच होता. महानुभावीय नव्हे. एक तर 'कानड देशा तेलंग देशा न वचावे' हा महानुभावीय दंडक त्यांनी पाळलेला दिसत नाही. दुसरे असे, की तीर्थाटणाची त्यांची तऱ्हाहि महानुभावीय नाही, वैदिकच आहे. तिसरे असे, की त्यांच्या उपासनेत संबंधी पाषाण वा मूर्ति हा प्रकार दिसत नाही. चौथे असे, की इतर व्रते वर्ज्य' हे महानुभावीय तत्त्व, यांच्या मठात महाशिवरात्री सारखे व्रत व होळी पौर्णिमा इ. सारखे वैदिक सणवार साजरे केले जात यावरूनच अमान्य होते हे सिद्ध होते. हरदास–पुराणिकांचे कार्यक्रम, अभिषेक–पूजादि उपचार इ. गोष्टी महानुभावीय आचारधर्मास धरून आहेत काय ? राघव चैतन्य व श्री. लाडलेसाहेब हे एक आहेत व ते हिंदूच आहेत हे दाखविण्याकरिता श्री. वेन्द्रयांनी जे अठरा मुद्दे मांडले आहेत ते[illegible] हे निर्विवादपणे दाखवितात, की चैतन्यांचा संप्रदाय महानुभावीय आचार धर्माचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कापायवस्त्र परिधान करीत असत. तथापि जेझिया करमाफी संबंधी व यवनांनी नागे गोसावी इत्यादि हिंदु साधु लोकांवर जो गहजब उडविला यापासून अलिप्त रहाता यावे म्हणून महानुभावांनी कापायवस्त्र टाकून देऊन काळी वस्त्रे धारण केली. एवढेच नव्हे तर जेझिया माफीच्या बादशाही सनदेत (शाहापोश) काळी वस्त्रे धारण करणारे हे शब्द लिहवून घेतले. या जेझिया कर माफीवरूनहि इतर हिंदूंच्या मनात महानुभावीया संबंधाने किल्मिप उत्पन्न झाले". (महानुभावीय मराठी वाङमय, आ. २ री, पृ. ९०) त्यांनीच इतरत्र नमूद केल्याप्रमाणे (मराठी वाङमयाचा इतिहास, भा. २ रा, ल. रा. पांगारकर) महमूद शहा बहामनीच्या कारकीर्दीपासून महाराष्ट्रात यवनाचा जाच सूरू झाला. अहमदशहा व हुमायूनशहा यांच्या कारकार्दीत म्हणजे शके १३४४ ते १३८५ या काळात हिंदूंचा अमानुष छळ झाला. त्याचवेळी महानुभावीयांची काषायवस्त्रे कृष्ण झाली असतील. म्हणजे राघव चैतन्यांच्या जन्मापूर्वीच महानुभावी संन्यासी 'शाहपोष' झाला असावा. तेव्हां राघव चैतन्यांचा भगवावेष त्यांना महानुभावीय संन्यासी कसा ठरवू शकतो आणि मशीद इ. विषयी त्यांनी जो भेद राखिला आहे त्यांवरून ते यातिधर्मातीत, पंथवेपातीत कसे ठरू शकतात हे एक श्री. वेन्द्रेच जाणोत ! पुनः असे, की 'रंगनाथा नावडे वृत्ति। तपस्तेज देवोनि हाती। यवनरक्षणाची कृती। नावडे त्या।।' या प्रकारे ज्यांच्या स्वतंत्र, बाणेदार व तेजस्वी वृत्तीचे कृष्णदासाने वर्णन केले आहे, ती इस्लाम धार्जिणेपणा व नामर्दपणा यांना वळी पडून कृष्णवेप धारण करू देईल हे श्री. वेंद्रे यांना कसे संभवनीय वाटते हेच कळत नाही. बापाशी भांडण करून, संसारावर लाथ मारून व प्राणहि वेचून कडकडीत तपश्चर्या करणाऱ्या राघव चैतन्यांच्या बाबतीत हे शक्य आहे असे मानणे खरोखरीच आम्हांसच शोभून दिसते.

पूर्वोक्त दोनतीन गोष्टींपैकी दुसरी गोष्ट केशव चैतन्यांच्या संन्यासासंबंधीची. यावेळी श्रीपादस्वामी व विठ्ठलपंत यांची आठवण होते. कृष्णदास वर्णन करितो, की "शास्त्रकाढोनि विश्वनाथास। सद्गुरु सांगती विश्व नियमास। ठाव पाहाती वैराग्यास। कितीक असे।। पुत्र जाहल्या विना जगती। पितरा होय अधोगती। म्हणोनिया तुजप्रती। संन्यास घेता न ये।। पुत्र जाहल्या वाचोन। स्त्री त्यागितां न ये जाण। अधर्म घडे दारुण। जगती या।। जाहल्या उपरी एक पुत्र। तोपतां तुझे कलत्र। उद्धरोनि जाता गोत्र। सन्यास देईन तुज मी।।" ही विचारसरणि शुद्ध वैदिक आहे. महानुभावी संन्यासात ऋणापकरणाची, गोत्रोद्धाराची, स्त्री-संतोपाची बाबच नाही. स्त्रियांनाहि सन्यास देण्याची, बुद्ध धर्माप्रमाणे, त्यालाहि लगबग व चिंता ! राघव चैतन्यांचे केशव चैतन्यांच्या संन्यासा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विषयींचे हे वर्तन श्री. वेन्द्रयांच्या संशोधकी बुद्धीस खोटे पाडणारे आहे ! तिसरी गोष्ट ही, की राघव चैतन्य व बाबाजी चैतन्य हे बालब्रह्मचारी असून सन्यासी होते, त्यामुळे त्यांच्या दर्ग्यात स्त्रीला दर्शनासहि जाऊ देत नाहीत. हा प्रघात सर्व सामान्य आहे असे श्री वेन्द्रेहि म्हणतात. प्रश्न असा, की तो महानुभावीय की वैदिक ? आणखी इतरहि प्रतिपादनाबाबत सबळ आक्षेप घेता येण्या जोगे आहेतच. ते कुठवर ध्यावेत ? निराकार पिंडीवरून त्यांनी महानुभावीयत्व ठरविले आहे. पण त्यातहि महानुभावीयता काय आहे ? राघव चैतन्याच्या पूर्वी होऊन गेलेल्या श्री नरसिंह सरस्वतीच्या निर्गुण पादुका सारखाच तो प्रकार आहे. इस्लामची धाड श्री. वेन्द्रयांनीहि वर्णन केलेली आहे. तिचा तो नैसर्गिक परिणाम आहे. चांगदेवाच्या समाधीवरील निराकार लिंगाचा त्यांनी उल्लेख केला आहे. (पृ. १६३) ते जर महानुभावीय नव्हते, तर हेच का तसे ? श्री. वेन्द्रे यांच्या बेबंद ऐतिहासिक बुद्धी व्यतिरिक्त तिला आधार नाही. राघव चैतन्य मोठे विद्वान होते असे श्री. वेन्द्रे म्हणतात. एवढा अनुभवी व विद्वान् अनुयायी महानुभावांना, त्यांच्या पडत्या काळात लाभला असता तर त्यांनी त्याचे केवढे स्तोम माजविले असते ? आपल्या गुप्त लिपीत त्याचे ग्रंथ त्यांनी केवढ्या काळजीने राखून ठेविले असते ? राघव चैतन्यांच्या विद्वत्तेचा पुरावा म्हणून श्री. वेन्द्रे यांनी त्यांच्या एका महागणपति स्तोत्राचा उल्लेख केला आहे. त्या स्तोत्राच्या शेवटी 'इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्यवर्य श्रीराघव चैतन्य विरचितं...' असे वैदिक पद्धतीस अनुसरून आहे...अभ्यासक श्री. वेन्द्रयांच्या प्रतिपादनाबद्दल एवढ्यावरून देखील आपले मत बनवू शकतात ! (अपूर्ण)

—ब. स. येरकुंटवार

सम्पादकीय (पृष्ठ २ वरून)

(१) संशोधनाच्या क्षेत्रात सत्याला अग्रस्थान देणे (२) सुचलेले प्रमेय जनात मांडण्याची घाई न करता भक्कम पुरावे गोळा करणे, त्यांची छाननी करणे व स्वतःच त्या संबंधी निःपक्षपाती निर्णय करणे. आणि मगच ते प्रमेय इतरांच्या विचारार्थ मांडणे. (३) नवीन काहीतरी मांडण्याच्या हव्यासामुळे अर्धकच्चे किंवा पूर्वखंडित मत मांडण्याचा मोह टाळणे आणि (४) स्वतःचे मत इतरांनी सप्रमाण व युक्तिवाद पूर्वक खोडून काढल्यास ते सोडून देण्याचा प्रांजळपणा ठेवणे.

संशोधकाची भूमिका ही अत्यंत जबाबदारीची आहे. ती जबाबदारी न ओळखता जेव्हा वाटेल त्या प्रकारचे संशोधन असिद्ध अवस्थेतच सिद्ध मताच्या थाटात सामान्य जनापुढे मांडले जाते तेव्हां त्यांचा बुद्धिभेद होतो. आणि तो परिणामी घातक ठरतो. या साठीच संशोधकांनी आपली जबाबदारी ओळखून व उपरोक्त पथ्ये पाळून संशोधनाचे कार्य केले पाहिजे. यातच संशोधनाची व संशोधकांचीहि प्रतिष्ठा आणि समाजाचे हित आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

–प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस
वि. सा. संघ याजकडून

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

दि. १ ऑगस्ट १९६२ रोजी सायंकाळी ६–३० वाजता लो. टिळक पुण्यतिथि साजरी करण्यांत आली. यावेळी महाराष्ट्र राज्याचे बांधकाम व दळणवळण मंत्री मा. श्री. मा. सां. कन्नमवारजी यांचे अध्यक्षतेखाली धनवटे–रंगमंदिरांत प्रा. डॉ. ना. र. देशपांडे यांचे "लो. टिळक आणि भारतीय लोकशाहीची वाटचाल" या विषयावर विचारपरिप्लुत व्याख्यान झाले.

दि. २२–८–६२ रोजी सायं. ६–३० वा. डॉ ना. गो. कालेलकर डी. लिट्. (पॅरिस) यांचे "भाषिक प्रश्न आणि भाषाशास्त्र" ह्या विषयावर, प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांचे अध्यक्षतेखाली, गडकरी सभागृहात माहितीपूर्ण भाषण झाले.

नाट्यसमिति

दि. २८–८–६२ रोजी सायं. ६–३० वाजता नाट्यसमितीतर्फे नाट्याचार्य कै. कृ. प्र. खाडिलकर यांची पुण्यतिथि, प्रा. श्री. ना. वनहट्टी यांच्या अध्यक्षतेखाली साजरी झाली. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे यांचे व्याख्यान झाले.

देणगी

नागपूर महानगरपालिकेकडून विदर्भ साहित्य संघाला रु. २००/– देणगी मिळाली या बद्दल विदर्भ साहित्य संघ नागपूर महानगरपालिकेचा अत्यंत आभारी आहे.

पुढील सद्‌गृहस्थ आजीव सभासद झाले, यावद्दल विदर्भ साहित्य संघ त्यांचा आभारी आहे.

श्री. प्रा. श्री. मा. कुलकर्णी,	नागपूर	५० रु.
न्या. मू. श्री. ग. व. वडकस,	नागपूर	५१ रु
श्री. पुं. वा. देव,	चांदा	५१ रु·

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. भगवतीप्रसादजी मिश्र,	चांदा	५१ रु.
श्री. प्रा. श. वि. जोग,	नागपूर	५० रु.
श्री. स. कृ. पाध्ये,	पुणे	५० रु.

शाखावृत्त

गोंडवन शाखा–

शाखेतर्फे वृत्तपत्रकार व नाटककार श्री. ना. रा. बामणगावकर यांची पुण्यतिथि प्राचार्य श्री. मामासाहेब ओक यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली. यावेळी श्री. तु. ना. काटकर आणि श्री. अविनाशचंद्र अनवाणे यांची भाषणे झाली.

गोंदिया शाखा–

शाखेतर्फे रविवार दि. २६–८–६२ रोजी दुपारी भवभूति–रंगमंदिरात नाट्याचार्य कै. कृ. प्र. खाडिलकर स्मृतिदिन साजरा करण्यात आला. त्यावेळी स्थानीय एन्. एम्. डी. कॉलेजातील मराठीचे प्राध्यापक श्री. खंडकर यांचे उद्बोधक भाषण झाले. यावेळी श्री. हेमकान्त चौधरी यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले होते.

भेट–

वि. सा. संघाचे सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी विभागीय समाजकल्याण अधिकारी श्री. वि. ध. चहांदे यांचे समवेत बुधवार दि. २९–८–६२ रोजी दुपारी गोंदिया शाखेच्या भवभूति–रंगमंदिराला भेट दिली. यावेळी रंगमंदिराचे बांधकाम आणि इतर कार्याची माहिती शाखेचे प्रमुख कार्यकर्ते श्री. ग. गो. व्यवहारे, श्री. नानासाहेब तेलंग, श्री. क. के. कुलकर्णी, श्री. म. स. पुराणिक आदि मंडळींनी करून दिली.

नांदुरा शाखा–

शाखेतर्फे शिवजयंतीनिमित्त दि. ५, ६, ७ मे ६२ रोजी निरनिराळे कार्यक्रम झाले.

दि. ७ रोजी सकाळी ८ ते ११ पर्यंत श्री शिवाजी महाराजांच्या कार्याविषयी व्याख्यान झाले.

रात्री ८ वाजता प्राचार्य श्री. के. मा. मुनशी (खामगाव) यांचे शिवचरित्रावर व्याख्यान झाले.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ: परीक्षा समिति

प्रतिवृत्त--

केंद्राधिकाऱ्यांना प्रार्थना--

(१) ऑगस्ट १९६२ मध्ये झालेल्या सर्व परीक्षांचा निकाल जास्तीत जास्त दि. १५ सप्टेंबर ६२ पर्यंत स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध होऊन केंद्राधिकाऱ्यांकडे पाठविल्या जाईल. तसेच दि १ ऑक्टोबर १९६२ चे आत सर्व केंद्रांकडे प्रमाणपत्रे, केंद्रपुरस्कार, केंद्रखर्च पाठविण्यात येईल.

(२) आगामी परीक्षा १९ व २० जानेवारी १९६३ ला होतील. त्याकरिता परीक्षार्थ्यांनी केंद्राधिकाऱ्यांकडे आवेदनपत्रे सशुल्क देण्याची तारीख ८ ऑक्टोबर आणि परीक्षा समिति वि. सा. संघ यांचेकडे पाठविण्याची शेवटची तारीख १० ऑक्टोबर ६२ ही राहील

(३) अनिवार्य कारणास्तव ऑगस्ट सत्रात परीक्षेला बसू न शकलेल्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे, अर्धे परीक्षा शुल्क भरून अन्य आवेदन पत्रासोबत दि. १० ऑक्टोबर ६२ च्या आत आणि त्यांची रीतसर यादी केंद्राधिकाऱ्यांनी परीक्षा समितीच्या कार्यालयाकडे २५ सप्टेंबरच्या आत पाठविणे आवश्यक आहे.

तौलनिक परीक्षार्थी पट

परीक्षा		फेब्रुवारी १९६२	ऑगस्ट ६२
प्रवेश	-	८	१५१
प्रारंभ	-	१०५	२१७
विनीत	-	१९७	३५०
परिचित	-	३६	६२
स्नातक (खण्ड १)	-	-	२८
स्नातक (पूर्ण)	-	१५	१७
पारंगत (खण्ड १)	-	१	९
पारंगत (खण्ड २)	-	-	१
		३६२	८३५

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ऑगस्ट १९६२ चा परीक्षाफल

साहित्य पारंगत (अेम्. अे. समकक्ष)

द्वितीय श्रेणी–

श्री. सुरेश तारी (काळसें)
(डॉ. शिंगणापूरकर सुवर्णपदक)

साहित्य पारंगत (खंड १)

कु. उल्का के. वैंतुले, कु. सुधा ना. गडकरी, श्री. शं. तु. खोकले

साहित्य स्नातक (बी. अे. समकक्षक)

प्रथमश्रेणी–सर्वप्रथम

कु. अलकनंदा ना. मुनशी
(भारतीय भाषाध्ययन मंदिर, नागपूर)

द्वितीय श्रेणी–

कु. चित्ररेखा ना. हिंदळेकर
श्री. कि. ब. धुरी
कु. कालिंदी दा. कानिटकर

साहित्य स्नातक प्रथम खण्ड (ऑगस्ट १९६२)

कु. जयवंती तिवारी, कु. शकुंतला भांडारी, श्री. आ. म पाटील, श्री. व. रा. भटकर, श्री. श्री. स. महाजन, श्री. म. स. वाकोडे, श्री. र. द जती, श्री. शा. ना. वेलकर, श्री. मु ज. वानखेडे, श्री. प्र. गु. खोडे, कु. प्रभा बल्लाळ, श्री. ना. म. अडंक, कु. सुधा नाजपांडे, कु. चंद्रज्योति कात्यायन, सौ. वसुंधरा जोशी, कु. विजया जोशी, कु. आशालता औरंगाबादकर, कु. विजया धामापूरकर, श्री. ज. स. वैंतुले, कु. मंदा बा. वऱ्हाडपांडे

(प्रा.) **माणिक के. वैंतुले**
संचालक परीक्षा समिति
वि. सा. संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संलग्न संस्थावृत्त–

भारतीय भाषाध्ययन मंदिर, नागपूर

वर्षा प्रमाणपत्रवितरण व दीक्षान्त भाषण समारंभ शके १८८४ रविवार दि. ५–८–६२ ला दुपारी ४॥ वाजता मा. संचालक प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांच्या अध्यक्षतेखाली मा।नीय श्री. चि. गो. सहस्त्रबुद्धे, उपसंचालक, शिक्षण विभाग (विदर्भ), महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्या हस्ते पार पडला. याच प्रसंगी मा. पं. हृषीकेशजी शर्मा, प्रांतीय संचालक रा. भा. प्र. स. नागपूर यांचे दीक्षान्त भाषण झाले. आपल्या दीक्षान्त भाषणात पं. शर्मा म्हणाले की, 'भारताच्या भावनात्मक ऐक्यासाठी विविध भारतीय भाषांचा व नागरी लिपीचा अधिकाधिक प्रसार व उपयोग झाला पाहिजे. कुठल्याहि भाषेच्या कोणत्याहि शब्दावर बहिष्कार घालण्याचे कारण नाही.' याच प्रसंगी त्यांनी मंदिराला भवननिर्मितीकरिता म्हणून एक हजार एक रुपयांचे दान देण्याचे आश्वासन दिले. शारदावंदन व स्वागतपर पद्याने कार्यक्रमास आरंभ झाल्यावर संचालक प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी प्रमुख अतिथींचा स्वागतपूर्वक परिचय करून देऊन राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीने भारतीय प्रमुख भाषांचे अध्ययन आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. कार्याध्यक्ष प्रा. माणिक के. बैतुले यांनी मंदिराच्या कार्याचा थोडक्यांत परिचय करून दिला. श्री. बाबासाहेव सहस्त्रबुद्धे यांनी आपल्या भाषणांत भाषाध्ययनांतील अडचणीवर प्रकाश टाकला.

या प्रसंगी प्रा. दि. वि. वऱ्हाडपांडे, श्री. गं. स. गोखले, डॉ. दे. वी. दुरगकर, श्री. कटकवार, श्री. दि. वा. फडणवीस, श्री. र. गो. सहस्त्रबुद्धे आदि प्रमुख शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी'

जाहिरातीचे दर

पूर्ण पान – रु. ५०	अर्धे पान – रु. २५
¼ पान – रु. १५	⅛ पान – रु. ८

कव्हर पेज ४ साठी २० टक्के अधिक आकार पडेल.
कव्हर पेज २ व ३ साठी १० टक्के अधिक आकार पडेल.
वर्षांतून किमान सहा अंकात जाहिरात दिल्यास १० टक्के सूट
संपूर्ण वर्षभर जाहिरात दिल्यास २० टक्के सूट मिळेल.
विशेषांकासाठी वेगळा आकार पडेल. चौकशी करावी.

अभिकर्त्यांना योग्य ते कमिशन मिळेल.

जाहिरातींच्या संबंधी पत्रव्यवहाराचा पत्ता:–
व्यवस्थापक, 'युगवाणी'
वि. सा. संघ कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता,
नागपूर १.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी' दिवाळी अंक

पृष्ठ संख्या सुमारे ९० मूल्य १ रु.

'युगवाणी'चा येता अंक **दिवाळी अंक** म्हणून २० ऑक्टोबरला प्रसिद्ध होत आहे. या अंकातील कांही मान्यवर लेखकांची नांवे अशी:–

प्रा. श्री. के. क्षीरसागर, प्रा. भ. श्री. पंडित, श्री. द र. कवठेकर, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, श्री. ना. रा. शेंडे, श्री. दे. गो. लांडगे, प्रा. भ. प्र. मोहरीर, प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे, प्रा. भा. श्री. परांजपे, श्री. बाबा मोहोड, सौ. इंदुमती शेवडे

विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांना हा अंक नेहमी प्रमाणे सभासदत्वाच्या वर्गणीतच मिळेल.

शाळा, कॉलेज व वाचनालये यांनी युगवाणीची वा. व. ५ रु. भरल्यास विशेषांकासह सर्व अंक वर्गणीतच मिळतील. कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होता येते.

'युगवाणी' साठी जाहिराती स्वीकारल्या जातात. दरांची चौकशी करावी.

–संपादक

हे मासिक एम्. जो. सराफ यांनी नागपुर टाईम्स प्रेस, रामदासपेठ, नागपूर–१ येथे मुद्रित करून प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांनी वि. सा. संघाकरिता, संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ